# लोकधर्म

अनिल सहस्रबुद्धे

आनंदोत्सव
प्रकाशन मंच

प्रकाशक
चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर,
महाराष्ट्र, भारत

**लोकधर्म (Lokdharma)**
**(वैचारिक) (Bharatiya Theisms - Theoretical)**

**अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, श्रीराम चौक,
पाईपलाईन रोड (हॉटेल सागरच्या मागील बाजूस)
अहमदनगर ४१४००३
महाराष्ट्र, भारत. (०२४१) २४२४१६७/९८८१५००९४२

**© सौ. उषा सहस्रबुद्धे**

**प्रकाशक**
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट – प्रकाशन मंच
'आई', समर्थनगर, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड
अहमदनगर, महाराष्ट्र, भारत. ४१४००३

ISBN. 978-93-84887-12-4
प्रथम आवृत्ती २४ ऑगस्ट २०१६

**मुद्रक**
सुमनांजली ऑफसेट, अहमदनगर

**विशेष निवेदन** : 'आनंदोत्सव' प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.
सदर ग्रंथ निर्मितीचा संपूर्ण खर्च भाविकांनी केला आहे. लेखकाने ग्रंथ विक्रीतून उत्पन्न मिळाल्यास ते सेवाभावी संस्थांना देणगी सहाय्य देण्याचा संकल्प केला आहे.

**मूल्य** :- ५०/-



**समत्व दृष्टीपूर्वक सामरस्यपूर्ण सारणीस**

**अनिल सहस्रबुद्धे**

# हितगुज...

'लोकधर्म' हे छोटेखानी पुस्तक; हा भारतीय 'लोक'शी संवाद आहे. आपल्याशी हे पुस्तक नक्कीच धर्मविषयक संवाद साधेल. लोकधर्माला, पोथीनिष्ठा किंवा चौकटीत, त्रिकोणात, वर्तुळात, जेरबंद झालेली लोकसारणी, ही दुर्धर व्याधी वाटते. लोकधर्म हा नित्य नूतन, नित्य वर्तमान, म्हणूनच निसर्गतः गतिशील असतो. म्हणजेच तो सनातन असतो. जगाच्या भूत, वर्तमान आणि (भविष्यातही नक्कीच) भारतीय सनातन धर्म; हाच एकमेव धर्म असा आहे. त्या धर्माचे नैसर्गिक सत्त्व आणि स्वत्त्व; व्यक्त व स्पष्टपणे मांडणारे दोनच लोकबंध (लोकधारणा सूत्रं) आहेत. एक म्हणजे हे चराचर परमेश्वरस्वरूप आहे अर्थात प्रत्येक जण, प्रत्येक अस्तित्व परमेश्वररूपच आहे. दुसरे म्हणजे 'सर्व देव नमस्कार, केशवं प्रति गच्छती!' कोणत्याही देवाला नमस्कार केला, शरण गेले, त्याशी भक्तीने अनन्य झाले; तरी ते परमेश्वरालाच पोहोचते. या दोन लोकबंधातून प्रकटलेली समत्व दृष्टी आणि सामरस्याची वहिवाट हा लोकधर्माचा स्वभाव आहे. भारतीय लोकधर्म असा स्वाभाविक लोकधर्म आहे. याच भावनेने परमेश्वरी कारुण्याने ओतप्रोत असलेले पसायदान श्री ज्ञानोबा माऊलींना स्फुरले.

भारतीय लोकजीवनात या पुस्तकाच्या निमित्ताने असे चिंतन घडावे आणि अभेदमूलक, वर्गहीन, आस्तिक समाजाचे पुनर प्रकटन व्हावे; अशा माफक अपेक्षेसह; हे पुस्तक सादर करीत आहे. लोकधुरीण आणि लोक, तत्त्वज्ञ आणि प्रतिभावंत आदि सर्व लोकांकडून या पुस्तकाचे स्वागत होईल, असा विश्वास वाटतो.

**– अनिल सहस्रबुद्धे**

*

# भारतीय लोकधर्म

'भारतीय लोकधर्म' संकल्पनेचा विचार करीत असतांना; 'भारतीयलोक' म्हणजे कोणता मानवी एकात्म समूह? हा विचार क्रमप्राप्त आहे. आज भारत म्हणून ज्या देशाचा आपण उल्लेख करीत आहोत, तो खूपच मर्यादित असा भूप्रदेश आहे. अतिप्राचीन काळाचा विचार केला; तर 'सप्तद्वीपा वसुंधरा' कल्पनेतील जंबुद्वीप, लक्षद्वीप, शाल्मलीद्वीप, कुशद्वीप, क्रौंचद्वीप, शाकद्वीप आणि पुष्करद्वीप अशी सप्तद्वीपे उल्लेखित केली असून; त्यातील प्रथमद्वीप अर्थात जंबुद्वीप म्हणजे हिंदुस्थान, भारत, दक्षिणापथ इ. होय. हा जंबुद्वीप प्रदेश, आजचे सर्व शेजारी देश आणि अफगाणिस्तान, पूर्व इराण, आशियातील रशिया व चीनचा थोडासा भाग यासह 'आसिंधू सिंधू पर्यंता तस्य भारत भूमिका', असा विशाल भारत देश आपल्या डोळ्यासमोर येतो. असे असले तरी प्राचीन श्रुती आणि स्मृतींतील उल्लेख, 'रामायण', 'महाभारत' या आर्ष महाकाव्यातील उल्लेख, पुराणांत केलेली विश्वोत्पत्ती व पृथ्वीवरील लोकवस्तींची चर्चा आणि या सर्व उल्लेखांबरोबर केलेला वैश्विक विचार पाहिला तर; बृहन्‌भारताची कल्पना अधिक व्यापकपणे विचारात घ्यावी लागते. देश म्हणजे देशांतील माणसे; असे सूत्र विचारात घेतले; तर 'भारतीय लोक' या मानवी अस्तित्वाची व्यापकता, माहिती चिंतन आणि ज्ञान यांच्या कक्षेत येते. ही व्यापकता 'विराटपुरुषा'च्या स्वरूपासारखी आहे; हे लक्षात घ्यावे लागेल. हा विचार करतांना सूर्यसिद्धांताला शरण जावे लागते. एवढा व्यापक विचार 'भारतीय लोकधर्म संकल्पना', समजून घेतांना आवश्यक वाटतो.



# १. लोक

या संकल्पनेचा विस्तृत विचार पुणे येथील नितीन प्रकाशनाने जुलै २०१२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या; माझ्या 'लोकबंध' या ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीत, मी मांडला आहे. 'लोक' या मानवी अस्तित्वाचे अतिमर्यादित आणि विश्वव्यापक असे अर्थ स्पष्ट केले आहेत. त्यांत व्यक्ती (घटकलोक), एक विवक्षित समूह (अंगस्वरूप लोक), विश्वव्यापक जीवमात्रासह मानवी अस्तित्व (विराटपुरुष लोक) अशा अवस्था वरवर पाहता दिसत असल्या तरी; अगदी एका व्यक्तीमध्येही 'लोक'च्या, या तीनही अवस्था अनुभवता येतात. ही 'लोक'ची त्रिविधता असते. ती, लोकधारणा करणाऱ्या सूत्रांमुळे अर्थात 'लोकबंधा'मुळे अनुभवता येते. स्वामी विवेकानंदांनी सर्वधर्मसभेत उद्‌गारलेले 'बंधूंनो आणि भगिनींनो' हे सुप्रसिद्ध संबोधन 'लोक' संकल्पना स्पष्ट करणारे आहे. भारतीय लोकधर्म संकल्पना देखील त्यातून संदेशित झाली आहे. 'Folk-lore' या संकल्पनेला 'लोकसाहित्य', 'लोकवाङ्मय' 'लोकविद्या' असे पर्यायी शब्द सुचवून लोक मधील वर्तनपरंपरा, वस्तु किंवा साधनपरंपरा आणि शाब्दपरंपरा या त्रिविध आविष्कारांकडे भारतीय लोकसाहित्य विशारदांनी लक्ष वेधले. यांतूनही भारतीय धारणेनुसार लोक अस्तित्वाचे चिंतन किती व्यापकपणे करावे लागेल; हे निर्देशित झाले आहे. 'लोक'च्या आत्मप्रकटीकरणातून, लोकसाहित्याच्या आधारे, रुढी-परंपरांच्या स्वरूपावरून आणि विशेषतः दिव्यकथा किंवा दैवतकथा अर्थात मिथके यांच्या आधाराने आपण 'लोक'च्या उत्पत्तीविषयी तर्क बांधू शकतो. या विवेचनाचा अर्थ असा की समानमनस्कतेतून निर्माण होणाऱ्या, जीवनास आवश्यक असणाऱ्या सर्व अंगांसंदर्भाने, संदर्भनिष्ठेने आलेल्या 'लोकबंधा'मुळे, 'लोक'ची धारणा होते. 'लोक' या धारणांमुळे अनुभवता येतात. धारणा करणाऱ्या या लोकबंधांचे स्वरूप पाहता; अनुभूतीतून तयार होत गेलेला, 'लोक'धारणेसाठी कार्यान्वित

झालेला, परंपरेत लवचिकतेने परंतु मूलभूततेने वाहत राहणारा, सनातनातून आलेला, वर्तमानात जाणवणारा, भविष्यकाळात प्रगटण्याची क्षमता असणारा, लोकमानसातील जाणिवेचा, आनंद किंवा सौंदर्यभावनाप्राप्त कल्पनाप्रवाह म्हणजे 'लोकबंध' होय. 'लोकबंध' वर्तनपद्धतीतून, विविध वस्तुरूपातून, चिन्हे, प्रतीके, प्रतिमा यांमधून आणि या सर्वांच्या भाषिक रूपातून प्रकट होतो. या प्रकारे 'लोकबंध' आविष्कृत करण्याची 'लोक'ची धडपड असते. कारण लोकबंधातून लोकधारणा घडत असते. धरणीमाता, गंगामाई, 'दैव देतं, कर्म नेतं', 'बेडकाचं लग्न लावा, पाऊस आलाच समजा', 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ', 'माणसानं माणसासारखं वागावं' 'राजा बोले दळ हाले', 'त्याच्या पुढं कुणाचं काय चालतं' इ.इ.इ.... 'लोक'चं अस्तित्व अशा लोकधारणा करणाऱ्या 'लोकबंधा'मुळे चिरंतनाचा प्रवास करतं.

मानवी तत्त्वज्ञानाच्या मुळाशी 'लोकबंध' असतात. त्यांतूनच जाणीवपूर्वक निश्चित नियम करणारे तत्त्वज्ञान अवतरते. 'लोकबंध' हा अनुभूतींचा सामान्यीकरण, अभिनिवेश असतो. तर या सामान्यीकरणातून शास्त्रीय माहितीसह तत्त्वज्ञानाची मांडणी होते. त्यानुसार सारणी पारंपरिक होताना पुढील, पुढील प्रवासात 'लोकबंध' आणि तत्त्वज्ञान; वर्तन – परिवर्तन – परंपरा – वर्तन अशा प्रक्रियात्मकतेने प्रकट होतच राहतात.

*



## २. भारतीय 'लोक'

भारतीय 'लोक', म्हणजे उपरोक्त बृहन स्वरूपातील जंबुद्वीपात अस्तित्वात आलेला लोक होय. 'भारतीय' असे म्हणतांनाच 'भारत' या लोकबंधांतून सुनिश्चित झालेला 'लोक' आपल्या आकलनकक्षेत येतो. भारत नामक भूमीच्या सनातन असलेपणाचा 'लोकबंध' अंतस्त्रोतासारखे आविष्कृत करणारा मानवी एकात्म समुदाय म्हणजे भारतीय लोक होय. या 'लोक'ला इतिहासातून प्रवाहित होत, वर्तमानात जाणवणारा आणि भविष्यकाळात झेपावणारा असा लोकधारणात्मक, लोकबंधांचा भक्कम असा आधार आहे. या लोकबंधाच्या तत्त्वज्ञान आणि सारणी स्वरूपाला 'धर्म' असे नाव आपण लावतो. अर्थातच या भारतीय लोकधर्माचा विचार येथे आपण करीत आहोत. 'भारतीय लोक' समजावून घेतांना भारतीय लोकधारणांचा सनातन प्रवास लक्षात घेतला पाहिजे. पृथ्वीवरील 'लोक'चा इतिहास पाहता 'भारतीय लोक'चे अस्तित्व अतिप्राचीनतम आहे हे उपलब्ध लिखित वाङ्मय, मौखिक परंपरा यांच्या लोकबंधात्मक लोकाविष्कारातून स्पष्ट होते. या प्राचीनतम अवस्थेपासून; जगभरातील लोकसमुदायांच्या लोकधारणात्मक लोकबंधांशी, घडलेल्या अभिसरणातून वर्तमानातील भारतीय लोक अस्तित्व, अर्थातच भारतीय 'लोकधर्म' स्वरूप, दृष्यमान होते आहे. लोकबंधांच्या सारणीतून लोकधारणेसाठी उदित झालेल्या 'धर्म' नावाच्या, संवेदनप्रवाहाचा (Stream of Conciousness) आपण अनुभव घेत आहोत. भारतीय 'लोकधर्म' म्हणून ज्याला म्हणता येईल; त्याचे स्वरूप वर्तमानात अभिसरणातून प्रस्थापना – संघर्ष – स्वीकार – प्रस्थापना – परंपरा या तत्त्वज्ञान आणि सारणी अशा प्रक्रियेसह प्रवाहातही अनादि लोकबंधात्मक अस्तित्वासह आविष्कृत होतांना दिसते. दैवतकथांच्या सांस्कृतिक मनःपिंडासह, आविष्कृतीतून बृहन भारतातील 'भारतीय लोक' मध्ये हे अनुभवता येते.

‘भारतीय लोक’ या मानवी अस्तित्व समूहरूपात आज धर्म या नावाने ओळखले जाणारे समूह; भारतीय लोक म्हणूनच जगाला मान्य करावे लागतात. भारतीय लोक यात सनातन भारतीय लोकसंस्कृतीतून लोकबंधात्मकतेने प्रकटलेला सनातन धर्म त्यांतील वैदिक-अवैदिक परंपरांसह; तसेच स्थल काल परिस्थिती सापेक्षतेने, क्रियाप्रतिक्रियात्मकतेने, वर्तन-परिवर्तनात्मकतेने प्रचलित आणि परंपरागत झालेल्या हिंदू, बौद्ध, जैन, शीख आदि मते, पंथ, संप्रदाय, सभा, मंडळ्या, संस्था यांसह ‘भारतीय लोक’ किंवा ‘हिंदुस्थानी’ अथवा ‘हिंदू’ म्हणून प्रामुख्याने ओळखले जातात; त्याचबरोबर भारतीय मुस्लिम, भारतीय ख्रिश्चन हे लोकसमूह याच ‘भारतीय लोक’चे अंगस्वरूप लोक म्हणून ओळखले जातात. याचे कारण म्हणजे समाननमस्कतेने होणारा लोकबंधात्मक आविष्कार होय. या लोकबंधात्मक आविष्कारांची संवेदना तपासली तर; जंबुद्वीपातील अतिप्राचीन लोकधारणांच्या जाणिवांचा प्रवाह चैतन्यशालीपणाने ‘भारतीय लोक’मध्ये प्रवाहित झालेला दिसतो. अलिकडे जागतिक पातळीवर ‘भारतीय वंश’ असा शब्दप्रयोग वापरला जातो; तो शब्द या लोकधारणा प्रवाहाचे द्योतक होय. एकूण ‘भारतीय लोक’ हा; शक, हूण, कुशाण, बरबर, मोगल, डच, फ्रेंच, ब्रिटीश आदि इंग्रज इ. जगभरातील आपली स्वतंत्र ओळख सांगणाऱ्या लोकसमूहांच्या आक्रमक संघर्षातूनही; या आक्रमकांना ‘भारतीय लोक’मध्ये स्वप्रभावाने; सनातनत्वाने, सत्वशीलतेने, तत्त्वज्ञानात्मक आणि सारणी स्वरूपात सामावून घेऊन; ‘भारतीय लोक’ म्हणून आविष्कृत होत आहे. अभिसरणाला समरसतेने अनुभवत सनातनासह, संवेदनात्मकतेने स्वलोकबंधासह प्रकट होण्याची क्षमता असलेल्या; धारणा तत्त्वांतून ‘भारतीय लोक’ म्हणून एक प्रकाशमान अस्तित्वरूप घेऊन लोकसारणीस्वरूपात प्रत्ययाला येत आहे. **हाच भारतीय लोक चा ‘लोकधर्म’ होय.** या ‘लोकधर्मा’चे स्वरूप येथे समजावून घ्यायचे आहे.

*



# ३. भारतीय ‘लोकधर्म’ची जडणघडण

भारतीय ‘लोकधर्म’ची जडणघडण समजावून घेण्यासाठी ‘अथातो धर्मजिज्ञासा’ आणि ‘अथातो ब्रह्मजिज्ञासा’ या वृत्तीने थेट भारतीय ‘लोक’ उत्पत्तीपासून विचार करण्याची आवश्यकता आहे. मानव पृथ्वीवर केव्हां, कोठे कि कोठेकोठे, कसा, का; निर्माण झाला याविषयी मतभिन्नता असली तरी; प्राचीनतम सांस्कृतिक आधारांचे निःश्वास ज्या प्राचीनतम वाङ्मयात प्रकटले; त्या वाङ्मयाकडे यावेच लागते. ते वाङ्मय म्हणजे वैदिक आणि अवैदिक परंपरांचे प्रकटलेले वाङ्मय होय. हे वाङ्मय जंबुद्वीपातील वाङ्मय आहे हे आता निर्विवादपणे मान्य झाले आहे. ग्रीक संस्कृतीसारख्या पुरातन संस्कृती आणि आफ्रिकेतील काही जैविक आधारांवरून; आद्य प्रणालीविषयक केलेले दावे; भारतीय लोक मध्ये निष्पन्न झालेल्या या प्राचीनतम वाङ्मयाच्या परिशीलनामुळे मागे पडले आहेत. ‘लोक’चा उपरोक्त ‘लोकबंधात्मक’ प्रवास लक्षात घेता; हे भारतीय प्राचीन वाङ्मय तेवढ्याच नैसर्गिक अर्थात लोकधर्मात्मक पद्धतीने निष्पन्न झाले आहे असे म्हणता येते.

**३.१ मीमांसा विचार** लक्षात घेतला तर; वेदार्थाचा विचार करण्यासाठी जैमिनि आणि बादरायण यांनी प्रस्तुत केलेली मीमांसा अतिशय स्पष्टपणाने भारतीय लोकधर्म जडणघडणीवर प्रकाश टाकतात. जैमिनींनी कर्मकांड मीमांसा मांडली असून हे मंडन बारा अध्यायांचे ‘संकर्षण कांड’ आणि चार अध्यायांचे ‘देवताकांड’ यांत केले आहे. बादरायणांनी चार अध्यायात ब्रह्ममीमांसा मांडली आहे. ‘कर्मकांड’ मीमांसेला पूर्वमीमांसा आणि ब्रह्ममीसांसेला उत्तरमीमांसा असे म्हणतात.

अगोदर मानवी सारणी की अगोदर धर्म? यांत निखालसपणे अगोदर मानवी सारणी व नंतर धर्म असाच प्रवास झाला. ‘लोकबंध’ संकल्पनेतून ह्याचे अधिक स्पष्टीकरण होते. मीमांसकांचे विचार विचारवंतांनी अक्षरशः प्रमाण

मानले आहेत. स्वाभाविकपणे भारतीय लोकधर्म विचारात मीमांसेला महत्त्वाचे स्थान आहे.

**३.२ 'आस्तिक' आणि 'नास्तिक'** विचारांचे, भारतीय 'लोकधर्म' विचारातील स्थान अनन्यसाधारण आहे. वेदप्रामाण्य स्वीकारणारे ते आस्तिक मत आणि वेदप्रामाण्य नाकारणारे ते नास्तिक होत. अर्थात ईश्वराचे अस्तित्व मानणारे आस्तिक आणि न मानणारे नास्तिक.

सहा आस्तिकांत पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा, न्याय, वैशेषिक, सांख्य आणि योग यांचा समावेश आहे.

सहा नास्तिकांत बौद्धांचे चार प्रकार अनुक्रमे माध्यमिक, योगाचार, सौत्रांतिक आणि वैभाषिक यांचा समावेश असून; जैन मत आणि चार्वाक मत यांचा समावेश होतो.

स्वाभाविकपणे वैदिक वाङ्मयावरील प्रतिक्रियात्मकतेने नास्तिक मते प्रकटली आहेत. त्या प्रतिक्रियांचे वाङ्मयस्वरूप नंतर प्रकट होणे अपरिहार्य असले तरी आस्तिक आणि नास्तिक प्रणाली अति प्राचीन 'लोकधर्म' अवस्थेत अनुभव व्यवस्थापन प्रक्रियेत अर्थात लोकबंध व्यवस्थापन प्रक्रियेत प्रचलित आणि संघर्षात्मक अथवा मंथनात्मक स्वरूपात लोकधारणांमध्ये सहभागी होत्या हेही निर्विवादपणे म्हणता येते. मात्र भारतीय 'लोकधर्म' धारणासूत्रांत त्यांना महत्त्वाचे स्थान देऊन समन्वय आणि सामरस्यपूर्वक खंडन मंडन केले आहे.

**३.३ भारतीय लोकधर्माचे सुडौल स्वरूप श्रुति वाङ्मयात प्रकटते;** हे लक्षात घ्यावे लागते. या श्रुति वाङ्मयात ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद सारख्याच मान्यतेसह प्रमाण मानलेले दिसतात. त्याचबरोबर श्रुतींची अधिक स्पष्टपणे चर्चा व स्पष्टीकरण करणारे प्रत्येक वेदाचे संहिता, ब्राह्मण, आरण्यक आणि उपनिषद असे भाग असतात. वरील धर्ममीमांसा संहिता व ब्राह्मण या भागांवर आधारित आहे तर ब्रह्ममीमांसा आरण्यक आणि उपनिषदावर आधारित आहे. श्रुति वाङ्मयाचे आयुर्वेद, धनुर्वेद, ज्योतिर्वेद असे उपवेद दिसतात. चौदा विद्या आणि चौसष्ट कला यांचा विकास झालेला दिसतो. हा श्रुति वाङ्मयाच्या प्रचलनाचा परिपाक होय.

भारतीय 'लोकधर्म' कल्पनेत या वाङ्मयातील अनुभूतिसंचित आणि विचारसंचित यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. सामान्यतः भारतीय 'लोक'मध्ये वरवर पाहता या वाङ्मयाचा अभ्यास आणि माहिती यांचा अभाव



अनुभवास येत असला; तरी 'लोकधर्मा'मध्ये या वाङ्मयांतील अनुभव प्रक्रियेतून आणि विचार प्रक्रियेतून प्रकटलेले 'लोकबंध' स्वभावतः अंतःस्रोत स्वरूपात प्रवाहित आहेत; हे स्पष्टपणे वर्तन, साधन आणि शाब्द परंपरांमधून पाहता येते. उदा. रानात जेवायला बसलेला श्रमिक भोजनापूर्वी चौदिशांना आपल्या घासातला घास वितरित करतो. शासनव्यवस्थापनात ज्यांचा उल्लेख अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती जमाती असा केला जातो त्यांच्या दैवतविषयक, निसर्गविषयक, कृषिविषय सारणीत याचा विशेष प्रत्यय येतो. याच दृष्टीने 'आदिमांचे वर्तमान' या माझ्या चिन्मय प्रकाशन औरंगाबादने प्रकाशित केलेल्या ग्रंथात आणि पद्मगंधा प्रकाशन प्रकाशित 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या ग्रंथात मी वर्तमानातील लोकसारणीच्या उदाहरणांसह यांवर प्रकाश टाकला आहे.

**३.४ भारतीय दैवतकता तथा पुराणांचा भारतीय 'लोकधर्म' जडणघडणीतील सहभाग** 'भारतीय इतिहास संकलन समिति, महाराष्ट्र'ने प्रकाशित केलेल्या पुराणान्तर्गत इतिहास या ग्रंथात 'भारतीय लोकधर्मा'च्या जडणघडणीतील सहभाग नेमकेपणाने नोंदविला आहे. त्यात जगाची सृष्टी, प्रलय आणि पुनःसृष्टी; सूर्य, चंद्र आदि वंशाच्या राजांचा इतिहास, ऋषीमुनी व दार्शनिकांचे कार्य, निरनिराळी मन्वंतरे, दशावतार कल्पना, पुराणांचा अभ्यास धर्मशास्त्र किंवा समाजशास्त्र अभ्यासण्यास आवश्यक, श्राद्धविधी, दानविचार, सोळा संस्कार, भूगोल, तीर्थक्षेत्रे, कालगणना, विज्ञान, तंत्रज्ञान यांशी पुराणांचा संदर्भ, पर्यावरण, संगीतशास्त्र, युगकल्पना, वाणिज्य व अर्थव्यवहार इ. अनेक 'लोक' अंगांवर प्रकाश टाकला आहे. पुराणांतर्गत वर्णने व कथा म्हणजे भारतीय लोकधर्माच्या सारणी स्रोताचे वर्णन होय. ब्रह्म, पद्म, विष्णू, वायू, भागवत, नारद, मार्कंडेय, अग्नि, भविष्य, ब्रह्मवैवर्त, लिंग, वराह, स्कंद, वामन, कूर्म, मत्स्य, गरुड, ब्रह्मांड या अठरा पुराणांचा प्रभाव आपणास दैवतकथा आणि राज्यविस्तार, लोकाचार आणि विधिविधाने या दृष्टीने केवळ जंबुद्वीपातच नव्हे तर जगभरात दिसतो. 'लोकसाहित्यातील धर्मश्रद्धा आणि त्यांचा अन्वयार्थ' या लोकसाहित्यविषयक, संशोधनपत्रिकेच्या विशेषांकातील लेखात मी नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील पुराणकथांचा क्षेत्रसापेक्ष सांस्कृतिक विश्लेषणात्मक अर्थ मांडून दाखविला आहे. त्यात अमृतवाहिनी प्रवरेचे प्राकट्य, तातोबाचा मठ अर्थात वाल्मिकींचा मठ, हरिश्चंद्रगड आणि विश्वामित्र कथा, जटायूतीर्थ टाकेद अशा कथांचा लोकधर्म धारणेतील

सहभागासह अन्वयार्थ प्रकट केला आहे. प्रवरा नदीच्या गॅझेटमध्येही मी प्रवरा खोऱ्यातील पुराणकथांचा लोकबंधात्मक आढावा घेतला आहे.

पुराणकथांच्या अस्तित्वांमुळे लोकजीवनाला स्थळ आणि परिस्थिती सापेक्ष 'धर' मिळाला आहे, ही धर्मधारणेच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट आहे. साने गुरुजींनी म्हटल्याप्रमाणे चराचरातील आत्मतत्त्वाचा साक्षात्कार लोकजीवनामध्ये प्रेरित करण्याचे कार्य घडले आहे. भूतपूर्व पंतप्रधान अटलबिहारीजी लोकधर्म जागरण करीत लोकमनाला चेतविण्यासाठी 'यहां का कंकर कंकर शंकर हैं ।' असे आवर्जून म्हणत असत. शक्तिपीठे, अवतारपीठे, देवके यांचा कुळधर्म कुळाचार यांतील श्रद्धापूर्ण सहभाग पुराणकथांच्या प्रचलनाचे फलित आहे हे लक्षात घ्यावे लागते.

**३.५ स्मृतिग्रंथांचे योगदान, 'लोकधर्मा'च्या जडणघडणीत** तेवढेच महत्त्वाचे आहे. अलिकडे स्मृतिग्रंथांना बहिष्कृत करण्याची एक प्रवृत्ती दिसते. मात्र स्मृतिग्रंथांचा विचार; स्थलकालपरिस्थिती आणि परंपरा या संदर्भांसह लोकसारणीचे पूर्व-संचित, धर्मधारणांच्या प्रचलनाचा प्रभाव, या संदर्भाने करणे आवश्यक असते. वर्तमानकाळात लोकशाही संकल्पनेतही 'राज्यघटना' प्रमाण मानून तत्त्वज्ञान आणि सारणी यांच्या संगतीवर आधारित सर्वांग व्यवस्थापन व न्याय प्रक्रिया करण्याचा आग्रह असतो. राज्यघटनेचे स्वरूप पाहाता स्मृतिग्रंथासारखेच असते. राज्यघटनेतही स्थलकालपरिस्थितीसापेक्ष धारणांनुसार परिवर्तनाची अपेक्षा असतेच. स्मृतिग्रंथांचे सांस्कृतिक महत्त्व यामुळेच आहे. 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या पद्मगंधा प्रकाशन प्रकाशित माझ्या ग्रंथात मी स्मृतिग्रंथाचे महत्त्व आणि कालबाह्यता अधोरेखित केली आहे. स्मृतिग्रंथ हे स्थलकालपरिस्थिती आणि परंपरा सापेक्षतेने प्रकट होत असल्याने; सांस्कृतिक सारणी विकास अथवा प्रचलनाचा ऐतिहासिक दस्तऐवज असतात. स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने, कुटुंबकेंद्रिततेने, समूहजीवनाचा व्यवस्थापनविषयक विचार त्यात आलेला आहे; पंचभौतिक तत्त्वांचा, प्राणिमात्रांचा अर्थात जीव आणि जगताचा मानवी सापेक्षतेने, मानवी जीवनात कोणत्या प्रकारे, सर्वथा स्थैर्य, न्याय, संरक्षण, उदरनिर्वाह आणि कौटुंबिक सुख प्राप्त होऊ शकेल; या दृष्टीने विनियोग करता येईल; अशा दृष्टीने, वेळवेळीच्या समाजधुरिणांनी परंपरेत आणलेली ती वर्तनसूत्रे अर्थात लोकबंध आहेत. लौकिक आणि पारलौकिक जीवनाचा, श्रद्धासमाधान, तात्कालिक आणि केवळ स्वरूपाचा आनंद, जीवनातील प्रेय, श्रेय आणि ध्येय



यांचा विचार; त्यात विश्वमानवी जीवन सापेक्षतेने, मानवी समूहजीवन डोळ्यासमोर ठेवून केलेला दिसतो. म्हणूनच स्मृतिग्रंथांचा स्वीकार वर्तमानकालीन परिवर्तनसापेक्षतेने आवश्यक तेवढा करण्यास हरकत नाही. भारतीय स्मृतिग्रंथ परंपरेत मनू, नारद, याज्ञवल्क्य आदि ऋषींपासून आर्य चाणक्यापर्यंत स्मृतिग्रंथात्मक मांडणी वेगवेगळ्या लोकांनी लोकव्यवहार, राजव्यवहार, न्यायव्यवहार, अध्यात्म आणि दैवतव्यवहार यासंदर्भात केलेली आढळते.

मनुस्मृति हे धर्मशास्त्र आहे म्हणजे नेमके काय आहे? ते प्रामुख्याने धर्माचारासंबंधी म्हणजे सारणीसंबंधाने मांडलेले परंपरेतून आलेल्या अनुभूति कल्पना यांवर आधारित धर्मशास्त्र आहे. या स्मृतीवर मेधातिथिं यांच्यापासून भारूचिपर्यंत अनेक पंडितांनी टीका केल्या. विविध स्मृतींमध्ये असलेले आचारधर्मांचे वेगळेपण, त्यांवर निर्माण जालेले सिंधूग्रंथ, स्मृतिग्रंथांचे पौरुषेय आणि लवचिक स्वरूप स्पष्ट करतात. 'लोकधर्म' धारणा नित्यवर्तमान असतात असे त्यांचे स्वरूप परिवर्तन प्रक्रियेत घडते. मात्र त्यांत मूलभूत मानवी संवेदना, जीवनाच्या गरजा आणि मानवाचे सृष्टीशी संबंध यांतील नित्यता जाणवते. तपशील बदलला तरी मानवी समूहजीवनाचे अध्यात्मिक मूल्य स्थिर असते. भारतीय लोकधर्मात याची ठळक प्रचिती येते.

*

# ४. भारतीय लोकधर्म जडणघडणीतील क्रियाप्रतिक्रियात्म संघर्ष, अभिसरण स्वीकार, नकार आणि सतत नूतन अर्थात सनातन स्वरूप

आस्तिक आणि नास्तिक मतांचा संघर्ष अभिसरण, स्वीकार–नकार यांचा विचार या अगोदर चर्चेत केला आहेच. कोणत्याही धर्मांची दोन अंगे स्पष्टपणे जाणवतात. एक म्हणजे तत्त्वज्ञान आणि दुसरे सारणी. लोकधुरिणांनी अनुभवसंचिताच्या घुसळणातून तत्त्वज्ञानाचे मंडन केलेले असले; तरी 'लोक'च्या एकूण हितासाठी त्याचे सारणीत परंपरागत होताना सारणीची रूपे, सूत्रे 'लोकबंध' स्वरूपात प्रसारित केली जातात आणि त्यातून लोकसंस्कृतीचे अर्थातच लोकधर्माचे स्वरूप प्रकटते. प्राचीन भारतीय लोकमध्येही भारतीय लोकधर्माचे स्वरूप बदलत गेले. अभिसरण आणि सामरस्य यांतून ते प्रगट झाले. भारतीय लोकधर्माच्या आधारांचे सुंदर वर्णन श्री संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीतील 'षड्भूज गणेश' या सांग रूपकातून केले आहे; हे सर्वज्ञात आहे. भारतीय लोकधर्माच्या स्वरूप घटनेचे दर्शन वर्तमान धर्मनिरपेक्षता तत्त्वापर्यंत येऊन पोहोचते. त्याचा तत्त्वज्ञानात्मक आढावा घेणे भारतीय लोकधर्म आकलनात महत्त्वाचा ठरतो.

**४.१ 'धर्म'** या शब्दाचा सुप्रसिद्ध अर्थ व त्यानुसार भारतीय लोकधर्मविचार याविषयी चर्चा करू लागले तर; धर्म या शब्दाचा अत्यंत रूढ अर्थ म्हणजे हिंदु धर्म, ख्रिस्ती धर्म, मुस्लिम धर्म अशा शब्दप्रयोगातून प्रतीत होणारा अर्थ होय. या 'धर्म' शब्दाचा अर्थ; मानव व विश्व यांवर नियंत्रण ठेवणारी एक अतिमानवी शक्ती ईश्वर अशी असून त्याचे स्मरण ठेवून त्याच्या आज्ञा म्हणून जीवनातील कर्मे करीत राहणे; असा आशय म्हणून सांगता येईल. त्याशिवाय महत्त्वाचा अर्थ म्हणजे कर्तव्य, नैतिक नियम यांचे पालन असा करता येईल. 'धर्म' या शब्दाला भारतीय परंपरेत वेदकाळापासूनचा इतिहास आहे. 'धृ' या धातूपासून तयार झालेल्या या शब्दाला 'धृ' म्हणजे धारण–पोषण करणारे तत्त्व असा अर्थ प्राप्त आहे. उपनिषदांमध्ये यांविषयी विस्तृत चर्चा येते. महाभारतात जो अर्थ सूत्र रूपाने दिला आहे तो यादृष्टीने महत्त्वाचा आहे. ''धारणात् धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजाः । यत् स्यात् धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः'' अर्थात व्यक्तीचे व समाजाचे धारण पोषण करतो म्हणून धर्माला धर्म म्हणतात. याशिवाय ''लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियमः कृतः । उभयत्र सुखोदर्क इच चैव परत्र च ।'' अर्थात लोकांचे जीवन सुखी होऊन इह परलोकी सुख मिळावे हाच धर्माचा हेतू असल्याचे निश्चित होते. स्वाभाविकपणे भारतीय 'लोकधर्म' म्हणून विचार करतांना भारतभूमीत अर्थात जंबुद्वीपात निष्पन्न झालेल्या अतिप्राचीन वाङ्मयातून जे धर्मतत्त्वज्ञान सांगितले ते वैदिक धर्म, सनातन धर्म अथवा भारताला हिंदुस्थान हे नाव मिळाल्यापासून हिंदु धर्म तत्त्वज्ञान म्हणून स्वीकारले गेले आहे. भारतीय 'लोकधर्म' म्हणून विचार करतांना उपरोक्त 'आस्तिक' आणि 'नास्तिक' तत्त्वज्ञानाचा भारतीय लोकधर्माचे तत्त्वज्ञान म्हणून विचार करावा लागतो. या तत्त्वज्ञानात निरीश्वरवादीही एकप्रकारे अंतिम सत्याकडे; ज्याला आस्तिक लोक वेदान्त असे म्हणतात; तिकडेच जातात. उदा. जैन मत स्पष्ट करतांना मराठी तत्त्वज्ञान महाकोशात कर्माच्या संपूर्ण नाशाला 'मोक्ष' म्हणतात; आणि हा 'मोक्ष'च धर्माचे अंतिम ध्येय आहे असे स्पष्ट केले आहे. ईश्वरविषयक कल्पनेची उपेक्षा केली असे म्हणता येईल अशा बौद्धमतांतील परिवर्तनाचे वर्णन करतांना बुद्धांनाच अनुयायांनी ईश्वराचे स्थान दिले. 'त्रिकाय सिद्धान्ता'नुसार धर्मकाय, संभोगकाय आणि निर्माणकाय ही तथागतांची तीन रूपे होत. धर्मकाय ही अनिर्वचनीय अंतिम सत्ता किंवा अखिल विश्वाचे नियामक तत्त्व होय. जेव्हा हे निरुपाधिक तत्त्व नामरूप धारण करते तेव्हा धर्मकायेचे संभोगकायेमध्ये रूपांतर होते. हे सर्व शक्तिमान, सर्वगामी, सर्वसाक्षी ईश्वररूपे होत. जीवांना सहाय्य करण्यासाठी तथागत वेळोवेळी जे अवतार घेतो त्यांना 'निर्माण काय' असे म्हटले आहे, असे स्पष्टीकरण महाविश्वकोशात दिले आहे.

या सर्व विवेचनाचा मतितार्थ असा की. हिंदुस्थानी लोकधर्माला अर्थात् भारतीय लोकधर्माला आस्तिक आणि नास्तिक तत्त्वज्ञान आणि आचार धर्माच्या अभिसरणातून रूप मिळाले आणि हे रूप स्वाभाविकपणे आस्तिक

मताने व्याप्त झाले. हे भारतीय लोकधर्माचे केंद्रवर्ती असे रूप आपल्याला वर्तमानात दिसते.

राधाकृष्णन यांच्या शब्दांत, ''भारताच्या जीवनातील एक ठळक वस्तुस्थिती म्हणजे ईश्वराची शाश्वत सत्ता होय.'' इंडियन फिलॉसॉफीतील हे विधान भारतीय लोकधर्म स्वरूपातील अभिसरण प्रक्रियेचे दिशादर्शक आहे.

**४.२ मुस्लिम धर्म आणि ख्रिश्चन धर्म यांचा भारतीय लोकधर्मातील अभिसरणात्मक संबंध** पाहणे हे अभिसरण प्रक्रियेच्या दृष्टीने आवश्यक आहे. जंबुद्वीप, भारत अर्थात हिंदुस्थान किंवा इंडिया ज्या परधर्मिय राजसत्तांच्या प्रभावाखाली होता तो धर्म म्हणजे मुस्लिम धर्म आणि ख्रिश्चन धर्म होय. या दोनही धर्मांनी भारतीय भूमीत आक्रमक मुसंडी मारून आपल्या धर्मतत्त्वज्ञान आणि सारणी यांचे अनुयायी मोठ्या संख्येने निर्माण केले. या अनुयायांचे धार्मिक आणि राजकीय परिप्रेक्षातील विक्राळ रूप आजही अनुभवता येते. भारतीय उपखंडामध्ये धर्माधिष्ठित राज्य निर्माण होणे. हजारो प्रार्थनास्थळे, दर्गे निर्माण होणे आणि त्याचबरोबर भारतभूमी जिंकून उपभोगासाठी पादाक्रांत केली असून ती आता आपल्या मालकीहक्काची भूमी असल्याची मनोभूमिका; एकूणच भारतीय पारंपरिक धार्मिकतेला धक्का देणारी विक्षेपक होती. मुस्लिम धर्मियांची सुलतानशाही अत्यंत परिणामकारक ठरली. यानंतर झालेल्या ख्रिश्चनधर्मियांनी एक प्रकारे भारतीय उपखंडातील मुस्लिमांची आक्रमकता थोपवली तथापि ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मोठ्या स्नेहभावाने आणि सेवाभावाने तरी सत्तेच्या पाठबळाने तसेच विज्ञाननिष्ठेच्या नावाने; भारतीय लोकधर्म दुबळा, अंध, मागासलेला ठरवून धर्मप्रसार केला. गेल्या दोनशे वर्षांच्या कालावधीत भारतीय लोकधर्म म्हणून ज्याकडे पाहावे त्याला हादरे बसले.

पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा वारसा ग्रीक तत्त्वज्ञानापासून सांगत आलेल्या तत्त्वज्ञानाला ख्रिस्ती धर्माच्या उदयानंतर पाश्चात्य जगतात धर्माला सुनिश्चित आणि संघटित स्वरूप मिळाले. पाश्चात्य धर्मतत्त्वज्ञानांमधून; धर्मतत्त्वज्ञानाने नैसर्गिक धर्माबरोबर श्रुत धर्माचाही विचार करावा का? ईश्वराविषयीच्या श्रद्धेला आधार कोणता? ईश्वराचे अस्तित्व बुद्धीद्वारा सिद्ध करता येते काय? आत्म्याचे अमरत्व आणि नियती यांचा कसा विचार करता येईल? धर्म हा केवळ नैतिक सद्गुण आहे काय? की धर्मामुळे नीतीला मूल्य प्राप्त होते? धर्म आणि विज्ञान यांचे संबंध काय? धर्म विज्ञानाच्या मार्गातील ज्ञानात्मक अडसर आहे काय? धर्म आणि सामाजिक आणि राजकीय व्यवस्था यांचे संबंध कोणते? असे प्रश्न वारंवार भारतीय 'लोक'मध्ये निर्माण होत राहिले. त्यांच्यामुळे सनातनातून आलेल्या भारतीय 'लोकधर्मा'ला काहीशी संभ्रमाची अवस्था आली. हिंदुस्थानात 'गेल्या दोन शतकांत संशयवादी विचारसरणीचा प्रादुर्भाव झाल्याने हिंदुधर्माचे स्वरूप दुबळे व विस्कळीत बनले' असा निष्कर्ष मराठी तत्त्वज्ञान महाविश्वकोशात काढला आहे. त्याशी सहमत व्हावेच लागते.

असे असले तरी मुस्लिम धर्म आणि ख्रिश्चन धर्म यांचा हिंदु धर्माशी घडेलल्या अभिसरण प्रक्रियेचा विचार केला तर डॉ. राधाकृष्णन यांचे विधान अति महत्त्वाचे ठरते. भारतीय उपखंडातील भारतीय 'लोकधर्मा'चे सर्वेक्षण केले तर जे चित्र दिसते त्याचे वर्णन मराठी तत्त्वज्ञान – महाकोश मंडळ, पुणे यांनी मराठी तत्त्वज्ञान महाकोश यात केलेले निष्कर्षात्मक वर्णन उचितच म्हणावे लागेल. 'मोठमोठ्या शहरांतून देखील धार्मिक औदासिन्य ही गोष्ट जरी वाढत्या स्वरूपाची असली तरी ती केवळ किरकोळ बाब आहे. खेड्यापाड्यातून तसेच लहान लहान गावांतून परंपरागत हिंदुधर्म हा जीवनाच्या अनेक अंगावर प्रभाव पाडीत असून, तो निरनिराळ्या समारंभांच्या व सणांच्या द्वारा त्यामध्ये एक प्रकारची लयबद्धता आणीत असतो.' सामान्यतः भारतात सर्वसाधारण आढळणारा सहिष्णु दृष्टिकोन ते स्वीकारतात व अनुसरतात.

*

# ५. धर्माविषयी चर्चा करतांना

जगाच्या पाठीवर धर्म अर्थात रिलिजन या नावाने आज मुस्लिम, ख्रिश्चन, हिंदू असे ठळक तीन धर्म प्रचलित दिसतात. याशिवाय शीख, जैन, बौद्ध यासारखे काही विचारकोश धर्म म्हणून पुढे येतात. असंख्य पंथही धर्म म्हणवून घेतात. या सर्व धर्मांची स्वतंत्र अशी विधिनिषेध प्रणाली अनुभवता येते. सणोत्सव, देवदेवता, उपासनापद्धती व त्यासाठीचे मंत्रतंत्र, विधिनिषेध, सुखदुःखे व्यक्त करण्याच्या पद्धती, सामाजिक बंधनपद्धती, जन्मप्रथा, मर्तिकप्रथा, खाद्यप्रणाली या गोष्टीसंबंधातील या मार्गांमध्ये लोकबंध भिन्न दिसतात. मात्र या सर्व वर्तनपरंपरा, साधन किंवा वस्तुपरंपरा आणि अनुषंगिक शाब्दपरंपरा किंवा भाषिक परंपरा यांना ठरीव व संप्रदायानुबंधित अर्थ प्राप्त झालेले असले; तरी त्यांचा केंद्रबिंदू मानवी कल्याण हाच असतो.

राजकीय आणि आर्थिक व्यवहार, घरेदारे, रस्ते, उद्याने, मठमंदिरे, प्रार्थनास्थळे, न्यायप्रक्रिया, संरक्षण संकल्पना, वस्त्रेप्रावरणे, सौंदर्यप्रकटीकरण साधने त्या त्या प्रणालीतील श्रद्धांशी जोडली जातात. ही श्रद्धा शेवटी त्या मूलकारणविषयक धारणारूपाशी निगडित असते. एवढेच काय त्या मूलकारणाची प्राकृतिक वा व्यावहारिक संरक्षक शक्तिरूपे, ज्या प्राकृतिक गोष्टीत उदा. डोंगर, वृक्ष, नद्या, सरोवरे, समुद्र, स्थाने, स्थले यांच्यात असल्याची संवेदना प्रकटते; तेथे तेथे त्या मूलकारणाचे अस्तित्व शक्तिस्वरूपात धारणातत्त्व बनून येते.

लोकधुरिण, लोकनेते, दिव्य व्यक्तिमत्त्वे, अलौकिक प्रज्ञावंत शक्तिमत्त्वे असलेले नेते, शास्ते, विभूतिमत्त्वे त्या चिंतनतत्त्वाची शक्ती म्हणून पुढे येतात. जीवनाला जीवविण्यासाठी उपकारक ठरणाऱ्या सर्व गोष्टी जीवनसारणीत त्या महाकारणाची प्रातिनिधिक रूपे ठरतात. अशी देवदेवतांची असंख्य रूपे ही सर्व प्रणालींमध्ये मानसिक अनुभूतींच्या कसोटीवर सत्यच असतात. त्यामुळे लोकधारणा सूत्रांच्या स्वरूपात ती स्वीकारली जातात.

त्यांच्याविषयीच्या उपकारक संवेदना पुण्यमय तर अपकारक संवेदना पापकारक ठरतात. त्यांच्याही परंपरा आपणास प्रणालीत आढळतात. लोकवर्तनात्मक जीवनसारणी अशा लोकबंधात्मक सूत्रांनी आकारदृढ झालेली असते. संघमनाच्या कसोटीवर या सर्व गोष्टी धर्म म्हणून अर्थात धर्मातील विधिनिषेधांच्या स्वरूपात स्वीकारल्या जातात. आकाशातील आणि अवकाशातील दृश्य अस्तित्वे, सूर्य, चंद्र आदि दिव्य ज्योती, डोंगर, दऱ्या, सरोवरे, समुद्र, वायुलहरी, वृक्षवेली, पूज्य व्यक्तिमत्त्वे (आई, वडील, गुरुजी) या सर्वांना संघमनामध्ये दिव्यव्यक्तिमत्त्व, देवतारूपे म्हणून स्वीकारले जाते. त्यांचा समावेश मानवी जीवनातील सुखदुःखदायक गोष्टींची आधाररूपे म्हणून स्वीकृत होतो.

सृष्टीतील पंचमहातत्त्वे आणि मूलकारणे दिव्यत्व, मानवी अस्तित्वामध्ये पाहण्याची नैसर्गिक प्रवृत्ती ही मानवी व्यक्ती आणि संघमनाची अनादि प्रवृत्ती आहे. अशी शक्तिमान मानवी अस्तित्वे सिद्ध होऊ शकतात. याच्या अनुभूती येतात.

स्वदेहाची शक्तीस्थले विकसित करून; शारीरवैज्ञानिक सत्यत्वाच्या कसोटीवर सृष्टीतील तत्त्वे मानव शरीरात प्रकट करू शकतो याचा अभ्यास माणसाने सर्वप्रथम केला आहे. माणसाच्या साधनविकासाच्या, वैज्ञानिक विकासाच्या इतिहासात सर्वप्रथम साधन म्हणून माणसाच्या हातात नैसर्गिकरित्या उपलब्ध होती, ती त्याचे शरीर आणि मन ही दोन्ही साधने होत.

सृष्टी आणि मानव यांच्या अनुबंधित जीवनशैलीमध्ये माणसाला या साधनांचा दिव्य उपयोग झाला. म्हणूनच त्याने सर्व शक्तिमत्त्वांना मानवी रूपात आपले आराध्य म्हणून स्वीकारले. मनाच्या उत्कटत्वाने आणि अवगतवाणीशक्तीच्या योगाने; शक्तींचे जागरण करता येते; हे विज्ञान माणसास अवगत होण्यात, माणसास आणि मानवी समूहास यश आले. याच प्रक्रियेने मानवी जीवनप्रणालीत, धुरिणांनी मानवी स्थैर्य आणि सुखरूपता यासाठी; सर्व शक्तिमत्त्वांना त्या मूलकारणाचे पार्षद, अवतार, स्वरूप, अंश म्हणून स्वीकारले आणि मानवी प्रणालीमध्ये या सर्व दिव्य अनुभूतींना देवत्व बहाल झाले. त्यांना शरण जाण्याच्या परंपराही निर्माण झाल्या.

या परंपरांना न जुमानता स्वतः त्यांच्या पातळीवर जाऊन, शक्तिमत्त्व जागवून, शोषण करणाऱ्या प्रवृत्तींना दानवत्व प्राप्त झाले, देव दानवांची युद्धे,

मानव्याच्या इतिहासात, मानव्य रक्षणासाठी, कथात्मक सत्यांश घेऊन अवतीर्ण झाली. एकूण मानवी जीवनप्रणालीत संस्कृती, प्रकृती आणि विकृतीची प्रत्यक्ष मानवी रूपे अस्तित्वात आलेली पाहावयास मिळतात. ती रूपे मानवास अवगत होत गेलेल्या शारीरविज्ञान, मनोविज्ञान आणि भौतिक विज्ञान यांच्या अभ्यासातून घडलेल्या उपयोजनाने होय. धर्म स्वरूपाच्या जडणघडण, मूलकारण, वृत्तीप्रवृत्ती, उगम विकास आणि वर्तमान यांचा इतिहास त्यात मानवाची दृष्टी आणि अस्तित्व रूपे प्रामुख्याने दैवत कल्पना, साधन कल्पना, व्यवहार कल्पना, संबंध कल्पना; यांना प्राप्त झालेले धारणात्मक सारणीरूप यांची अशी चर्चा 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या ग्रंथात मी केली आहे. बहुधा या प्रक्रियेला कोणताही धर्म अपवाद नाही.

**५.१ धर्म म्हणजे लोकनिष्ठ अध्यात्मवादी दृष्टी** अध्यात्माची जाणीव प्रत्येक माणसाला आहे; ही गोष्ट प्रत्येक माणसाच्या भावना, बुद्धी, विचार आणि त्याचे वर्तन यांतून स्पष्टपणे जाणवते. हे त्याचे प्राणिमात्रांमधील वेगळेपण आहे; असे माणूस मानतो; नव्हे तसा त्याचा दावा आहे. माणूस नैसर्गिक अवस्थेत वावरत नाही. तो आपल्या जवळ निसर्गदत्त स्वरूपात असलेल्या मनाच्या शक्तींच्या सहाय्याने एक मानवी विश्व पंचभौतिक ब्रह्मांडात निर्माण करतो. म्हणजे 'मनसः जातः ।' हे माणसाचे स्वरूप 'मनसः जातः मनुविश्वः ।' अशा स्वरूपात; व्यक्ती, समूह आणि वैश्विक मानव या समग्र मानवी भावावस्थेतून प्रकटते. मानवकेंद्रिततेने सर्व वस्तुमात्रांकडे व मानवेतर प्राणिमात्रांकडे पाहणे, त्यांचा उपयोग आणि मानवाची अशी एक ऐहिक जीवनसारणी तयार करणे, अशा ईहवादी मानव अर्जित कल्पनाविश्वात; ते कल्पनाविश्व सत्य मानण्याचा प्रयत्न करून; पंचभौतिक अस्तित्वाच्या सत्यतेवर आणि ब्रह्मसत्येच्या साक्षीने तो मानवी सत्ता निर्माण करतो.

या मानवी सत्तेच्या तथाकथित सत्यतेत गढून जाऊन; त्यास स्वस्वरूपातील सत्याचाही विसर पडतो. एकप्रकारे 'अध्यात्म' संवेदनेपासून पारखा होऊन माणूस भोगनिष्ठ बनतो. साधने हीच साध्य मानून ती स्वतःच्या गरजा सतत वाढविण्याच्या चक्रात सापडतो. अध्यात्माची चर्चा, अध्यात्मसंवेदन, सर्वांभूती ब्रह्म ही भावना आणि यांशी सापेक्ष धर्मकर्ममीमांसा, श्रद्धा, भक्ती, सत्संग, पूजापाठ इ. सर्व गोष्टी त्याला एकतर देवभोळेपणाच्या, अंधश्रद्धेच्या, गूढवादी वेडगळपणाच्या वाटू लागतात. मानवता, कुटुंबसंस्था, विश्वकुटुंब भावनेपर्यंतची माणसामाणसातली नाती त्याला अकारण भावनिक गुंतवणूक वाटू लागते.

इहवादी, भौतिकवादी, विज्ञानवादी असे स्वतःला म्हणवत; तो स्पर्धेच्या गर्दी साधनांच्या आधीन होत शारीरिक, मानसिक आणि अंतप्रेरणात्मक संबंधात एकप्रकारे अपंग व पराधीन होतो. यातूनच अनाचार, दंभाचार, भ्रष्टाचार यांचे अनागोंदी थैमान हाच प्रतिष्ठित वस्तुनिष्ठ, व्यवहारनिष्ठ वर्तनपद्धतीचा सभ्यतापूर्ण आविष्कार वाटू लागतो.

मानवानेच सर्वकल्याणकारक, भूतमात्रनिष्ठ, भूतदयात्मक, प्रेममय भावनेने, निर्माण केलेले साहित्य, संस्कृती, कला, धर्मकर्म विधिनिषेध यांचे पाखांडपण माजते. स्वतःपासून संस्कृतीपर्यंत, देहापासून देवापर्यंत अवघा मानवनिर्मित प्रपंच विक्रीमूल्य देऊन; बाजारात मांडून तो मोकळा होतो.

ही भयाण स्थिती अनुभूत होत असताना; सद्सद्विवेक, मानवता, अध्यात्म, धर्ममूलकता, चराचरातील ब्रह्मस्वरूपात ओळखणारे, मानणारे, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, ऋषी, मुनी, तपस्वी, कवी, लेखक कलावंत, धर्मसंस्थापक असे 'भूलोकी'चे योगी, जीवाचा आकांत मांडून, ज्ञानात्मक कर्म करण्यात आणि कर्मात्मक ज्ञानप्रसृती करण्यात स्वतःला झोकून देतात. अध्यात्मवादी भूमिका आणि वैचारिक व्यूहाचे पुन्हा पुन्हा प्रसृतीकरण आणि संस्थापन करणे त्यांना आवश्यक वाटते. अध्यात्मवादी असा ब्रह्मनिष्ठ अर्थात लोकनिष्ठ असतो. त्याचे कर्म लोकनिष्ठेने घडत असते. त्याचवेळी तो विश्वात्मक लोक म्हणूनही बृहद ब्रह्मस्वरूपाचा अनुभव घेत त्यागयुक्त कर्मनिष्ठेने आणि अध्यात्मिक भाववृत्तीने भूतमात्रांचे ब्रह्मस्वरूपत्व अनुभवत असतो. ही अध्यात्मभावना सर्वांमध्ये कर्मनिष्ठेने संक्रमित होण्यासाठी त्याचे धडपडणे सुरू असते. हेच लोकनिष्ठ अध्यात्मवादी भूमिकेने धर्माचे पुनरजागरण व सारणीचेतन असते. यातूनच आपल्याला 'धर्म' दर्शन घडते.

*

# ६. भारतीय ‘लोकधर्म’ संकल्पना

भारतीय ‘लोकधर्म’ म्हणजे भारतीयत्व जाणवणाऱ्या ‘लोक’चा धर्म होय. जीव आणि जगत हे सर्वच परब्रह्माचे आविष्करण आहे. याची जाणीव अर्थात सर्वभूतमात्र परमेश्वरस्वरूपच आहेत हा ‘लोकबंध’ ज्या लोकमनाचा स्थायीभाव आहे; अर्थात संपूर्ण जीवनास्तित्वाचे धारणा तत्त्व आहे असा ‘लोक’ म्हणजे भारतीय लोक. या मूलभूत आस्तिक धारणातत्त्वानुसार; या भारतीय ‘लोक’ची, जीवनप्रणाली, जीवनसारणी, वर्तनप्रवाह, व्यवहारसारणी वर्णन करता येते. अशी जीवनप्रणाली म्हणजे भारतीय ‘लोकधर्म’ होय. हा भारतीय ‘लोकधर्म’ सनातन वैदिक प्रणाली, अवैदिक मतप्रणालींना सामरस्याने सामावून, पुन्हा पुन्हा आस्तिकतेने जैन, बौद्ध, चार्वाकादी मतांतील जीवनव्यवहार पोषक मते स्वीकारून प्रवाहित झालेली, मध्ययुगीन काळातील एकेश्वरवादालाही; अर्थात मुस्लिम, ख्रिश्चन प्रणालीतील मतांनाही आपल्यात सामावून पुन्हा सर्वाभूती परमेश्वर भावनेने जीवनप्रणाली जागवित वर्तमानात आणि वर्तमानातून भविष्याकडे झेपावणारी जीवनप्रणाली म्हणजे ‘भारतीय लोकधर्म’ होय. कर्मश्रेय म्हणून पारमार्थिकतेने ‘श्रीकृष्णार्पणमस्तु’ म्हणून त्यागमूल्य जपणारा आणि ऐहिक जीवनशैलीमध्ये; ‘श्रुति, स्मृति, पुराणोक्त फल प्राप्त्यर्थम्’ अशा संकल्पासह कर्मसाधना करणारा धर्म म्हणजे ‘भारतीय लोकधर्म होय.’ ‘सर्वेत्र सुखिनः संतु, सर्वे संतु निरायमः, सर्वे भद्राणि पश्चंतु, मा कश्चित दुःख भाग भवेत’ या नित्य सामूहिक कल्याण मंत्राचा उद्घोष करीत ज्ञानमयकर्म आणि कर्मज्ञानवान करण्याचा प्रयत्न ऐहिक जीवनांतील लोकबंधांमधून साधणारा धर्म म्हणजे ‘भारतीय लोकधर्म’ होय.

कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, न्यायिक, आर्थिक आदि सर्व मानवी जीवनव्यवहारात; तसेच पर्यावरण, जलप्रणाली, कृषीजीवन, प्राणीजीवन या संबंधातील जीवनव्यवहारात आणि मानवी जीवनाच्या स्थल, क्षेत्र, राष्ट्र आणि



वैश्विक जीवनव्यवहारात आस्तिक भावाने लोकबंधाचा अनुसार करणारा धर्म म्हणजे भारतीय लोकधर्म होय. प्रचलित धर्मप्रणालींमध्ये या धर्माला सनातनधर्म अथवा हिंदु धर्म असे संबोधले जाते. मात्र सर्वसमावेशक तरी वैविध्यपूर्ण आणि पृथकपणातील वैशिष्ट्ये सांभाळत आपल्या लोकधारणा प्रवाहांमधून सनातन भारतीय अध्यात्मिक मूल्यांचे धारणात्मक ‘लोकबंध’ आविष्कृत करीत; ‘भारतीय लोकधर्म’ म्हणून अनंत अवकाशाप्रमाणे आणि अफाट सागराप्रमाणे धारणेचे विराटरूप प्रकटविणारा आणि या रूपात विश्वातील सर्व ‘लोक’ विश्वरूप चैतन्यतत्त्वाने प्रकाशित होवोत. ‘‘कृण्वंतो विश्वम् आर्यम्’’ अशी घोषणा करणारा; आत्मतत्त्वाकडे अर्थात विश्वात्मक परमेश्वराकडे विश्वकल्याणाचे ‘पसायदान’ मागण्याची प्रार्थना आत्मिकतेने गाणारा धर्म म्हणजे ‘भारतीय लोकधर्म’ होय!

**६.१ भारतीय लोकधर्म, धारणतत्त्वांचा मूळस्त्रोत** कोणता याचे स्पष्ट आणि निःसंदिग्ध उत्तर म्हणजे ऋषी कार्यातून, साधनेतून, परिश्रमातून मौखिक परंपरेने, अनुभूतीसंचितासह सनातनपणे प्रकट होत राहिलेले ‘लोकवाङ्मय’ होय. या लोकवाङ्मयाला, ब्रह्मवेत्त्यांनी अर्थात अभिजनांनी वैदिक आणि अवैदिक स्वरूपात, आश्रमव्यवस्थेतून, संथादान प्रक्रियेतून, ज्ञान दान प्रक्रिया स्वरूपात गुरुपरंपरेने, कुळपरंपरेने परंपरागत केले असले; तरी त्याच वेळी त्याचे सारणीत विधिनिषेधात्मक पद्धतीने प्रसारण करून; समस्त मानवी समुदायांना, धुरीणपणे सारणीत समाविष्ट करीत, स्थायीपणाने परंपरेत प्रवाहित केलेले ज्ञान आणि क्रियात्मक लोकबंध स्वरूप प्राप्त करून धारणात्मक चैतन्यतत्त्व प्रकट केले. हे ‘लोकवाङ्मय’ हा भारतीय लोकधर्माचा मूळ स्त्रोत आहे. म्हणूनच ‘‘ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः’’ आणि ‘‘अतोऽस्मि लोके वेदेच’’ ही उक्ती भारतीय लोकधर्माच्या मुळाशी आहेत याची प्रचिती येते.

**६.२ भारतीय लोकधर्माचे आजचे तत्त्वज्ञानात्मक स्वरूप** जगातील सर्व प्रकारचे ईश्वरविषयक वाद भारतीय लोकधर्म सारणीत सामरस्याने विरून आहेत. ‘सर्व देव नमस्कार केशवम प्रतिगच्छति ।’ हे सर्वात्म परमेश्वर श्रद्धा सूत्र भारतीय लोकधर्मात प्रवाहित आहे. स्थलकाल परिस्थिती सापेक्ष सर्व स्थित्यंतरे या लोकधारणेत बेमालून एकरूप झाली आहेत. उदा. औद्योगिक विश्वातील यंत्रांनाही देवत्व बहाल करून सश्रद्धपणे यंत्राचाही वापर लोक करीत आहेत. शस्त्रपूजा, यंत्रपूजा अर्थात साधनपूजा या प्रत्यक्ष कर्मज्ञानवानतेने अनुभवली जात आहे. प्रचलित धर्मांमधील कर्मकांडाचा कर्मठपणा येते

सर्वात्मक परमेश्वर भूमिकेने नाहिसा झाला आहे. जन्मप्रथा, मर्तिकप्रथा, विवाहप्रथा यात संपूर्ण मानव्यवादी भूमिका येथे स्वीकृत आहे. असे असले तरी उपनिषदातील महावाक्यांचा प्रत्यक्ष अनुभव भारतीय लोकधर्माच्या तत्त्वज्ञानात्मक कर्मसारणीतून हा धर्म अनुभवत आहे. पापपुण्य, सोवळेओवळे, विधिनिषेधातील अतिरेकी कर्मकांड लोप पावले आहे. मात्र आस्तिक मताचा प्रभाव जीवनातील देवधर्मविषयक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय व्यवहारात; महानगरापासून वाड्यावस्त्यांपर्यंत सर्वदूर अनुभवता येते. याच न्यायाने दैवतांची संख्या, सणोत्सव, जत्रायात्रा, तीर्थविकास याची उदंड प्रमाणात वाढ होत आहे. गतिमान वैज्ञानिक युगातही आस्तिक मतांमुळे अस्थिरतेतील स्थिरता मनामनात जागवली जाते. म्हणूनच व्यापक सहिष्णुता, श्रद्धा, सौजन्य, सेवावृत्ती, समदृष्टी, स्वागतशील समावेशकता यांचा अनुभव सनातनपणे भारतीय लोकधर्म तत्त्वज्ञानाचा सामरस्यात्मक परिणाम म्हणून अनुभवता येते.

श्रुति, स्मृति, पुराणे यांचा परिपाक म्हणून प्रकटलेली सर्व तत्त्वज्ञान सूत्रे व श्रीमद्‌भगवत गीता, यांचा मूलाधार 'भारतीय लोकधर्म तत्त्वज्ञानात अनुस्यूत आहेच परंतु बौद्ध 'धम्मपद', पाश्चात्य धर्मतत्त्वज्ञानातील प्राचीन ग्रीक पुराणकथा, यांपासून सॉक्रेटीस, प्लेटो इ. चे विचार मध्ययुगातील सेंट अन्सेल यांचा सत्ताशास्त्रीय युक्तिवाद, अ‍ॅक्वायनसचे मानवशास्त्र व पदार्थविज्ञान यांच्यासह आलेले ईश्वरशास्त्रातील विचार तर आधुनिक तत्त्वज्ञानातील ल्यूथर, पास्कल, मालब्रान्श व बर्क्ले आदींनी बुद्धिवादातून केलेले युक्तिवाद; ह्यूमचे वास्तववादी दृष्टीने आलेले 'नॅचरल हिस्टरी ऑफ रिलिजन' यांतील विचार, कांट, हेगेल यांचे भारतीय तत्त्वज्ञानाला जवळचे विचार; फ्राईड, युंग, फ्रे, व्हर्गोट आदींनी दिलेले व्यक्ती आणि संघमानसशास्त्रीय विचार आणि मार्क्सने आर्थिक समतेचा समाजवादी विचारांना जवळ जाणारा आणि धर्म नाकारणारा विचार या सर्व विचारांनी प्राचीन आस्तिक आणि नास्तिक विचारांना ढवळून काढले आणि त्यातून भारतीय लोकधर्माचे तत्त्वज्ञानात्मक स्वरूप कर्मकांड आणि दैवतपूजन विधिविनांच्या दृष्टीने खूपच लवचिक झाले. उपनिषदातील महावाक्यांतील धारणांना यामुळे भौतिकवादाचा एकप्रकारे अडसर निर्माण झाला हे खरे असले; तरी भारतीय लोकधर्माचा आस्तिक तत्त्वज्ञान हा पायाभूत तत्त्वविचार ढासळला नाही. यात आर्य चाणक्य, आद्य शंकराचार्य आणि मध्ययुगीन संतमंडळी यांनी पुन्हा एकदा स्थैर्य आणले. अद्वैत व द्वैत मतांनाही



समन्वयाचे लोकबंध मध्ययुगीन संतवाङ्मयातून लाभले हे खरे. प्राचीन तत्त्वज्ञानातून प्रकटलेले 'यज्ञ' आधारित विधिविधानात्मक धर्मशास्त्र, तंत्रशास्त्र; या बरोबरच या शास्त्रांच्या प्रक्षेपातून प्रकटलेले यातूक्रियात्मक विधिविधानात्मक आणि विधिनिषेधात्मक शास्त्र; दैवतकथाशास्त्र व मानवी जीवनातील व मरणोत्तर जीवनविषयक शास्त्र यांविषयीची तत्त्वे या गोष्टी भारतीय लोकधर्मात हिंदू प्राचीन यज्ञसंस्था, तंत्रज्ञान संस्था यांच्याबरोबरच बौद्ध व जैन तंत्रज्ञान संस्था यांतून उदित झाली. लोकजीवनात वैदिक व अवैदिक शास्त्रांतून आलेल्या तत्त्वकेंद्री विधिविधानांना, कर्मकांडांना त्याच तत्त्वज्ञानाला पूरक तरी समांतर अशी संकेत, विधिविधाने परंपरेतून निर्माण झाली. या सर्व तत्त्वज्ञान आणि तंत्र विचारातून भारतीय लोकधर्माचे व्यामिश्र स्वरूप पुढे येत असले तरी; परमेश्वरी सत्ता, न्याय आणि जीवमात्रामध्ये असलेले परमेश्वरस्वरूप अर्थात आत्मतत्त्व, आत्मतत्त्वाची अर्थात चैतन्यतत्त्वाची चिरंतनता आणि शारीरसंघटनतत्त्वाची पंचभूतात्मक विघटनप्रक्रिया अर्थात मर्त्यता यासह दैवतकथाशास्त्र, कुटुंब, समाज, जात, धर्म, पंथ, निष्ठा यांसह परमात्मतत्त्व, पंचमहाभूते, चित्शक्ती, निसर्गचक्र आणि चराचरात परमेश्वरत्व पाहण्याची वृत्ती यांसह आजचे भारतीय लोकधर्माचे तत्त्वज्ञानात्मक स्वरूप प्रकटले आहे हे सनातनाचे वर्तमानातील परिवर्तीत रूप आहे असे म्हणता येईल. त्यामुळे नीती न्याय यासह जीवनाच्या सर्वांगातील वर्तन या स्वरूपात भारतीय लोकधर्माचे हे रूप पाहता येते.

**६.३ भारतीय लोकधर्माचे प्रसारक व प्रचारक** भारतीय लोकधर्मविषयक उपलब्ध माहितीनुसार ब्रह्मांडातील त्रिदेव कल्पनेपैकी शिवपार्वती संवादकथा आणि ब्रह्ममुखाने प्रसारित झालेले ज्ञान मौखिक परंपरेने, ब्रह्ममानस पुत्रांना मिळालेले ज्ञान यांचे संकलन, संपादन तसेच सृष्टीचलनातील आविष्कारांची केलेली निरीक्षणे व त्यांचे केलेले संकलन, संपादन व मांडणीसह मौखिक परंपरेने आपापल्या कुलांमध्ये प्रकट केलेले ज्ञान, यांपासून ते ग्रंथनिविष्ट आणि मौखिक परंपरा, यांतून परंपरेने प्रसार परंपरा दिसते.

यात ऋषींचे आणि त्यांच्या ऋषीकुलांचे कार्य अतिशय मूलगामी आहे. कृषीनिष्ठ पद्धतीने हे संकलित, संपादित, ज्ञान यज्ञसंस्था आणि कृषीकर्म यांसह ऋषींनी आकलित, संशोधित आणि व्यवस्थापित करण्याचा दीर्घोद्योग लक्षावधी वर्षे केला. या ऋषीकुलांतून कुटुंब व समाज संस्था विकसित होत असतांना; कुटुंब संस्था व समाज यांत हे धर्मज्ञान अथवा धारणातत्त्वांच्या

प्रस्थापनांचे कार्य पुरोहित वर्गाने केले. या पुरोहित परंपरांचीही सुरुवात ऋषीकुलातून झाली. सनातन धर्मसारणी हे ऋषीकार्याचे फलित आहे, एवढेच संक्षेपाने म्हणता येईल. यांत गुरुपरंपरेला फार महत्त्व आहे. माता, पिता, गुरु हे देव अथवा ब्रह्मस्वरूप होत; ही धारणा यांतूनच पुढे आली. यांना सर्वज्ञान अपौरुषेय स्वरूपात लाभले हीही कल्पना यांतूनच पुढे आली. मौखिक परंपरेने धर्मधारणातत्त्वांचे प्रात्यक्षिकांसह प्रयोगसिद्धतेने वितरण आणि प्रस्थापन करण्याचे कार्य ऋषीसंस्थेने केले. अर्थात हे ज्ञान लोकबंध स्वरूपात अभिजनकुलांसह लोकजीवनात प्रस्थापित करण्यात पुरोहित आणि संज्ञापक वर्गाचे मोठे कार्य आहे. वशिष्ट, अगस्त्य या अतिप्राचीन ऋषींनीही पौरोहित्य करण्याचे कार्य केले असे उल्लेख आढळतात. तेव्हांपासून पुरोहित वर्गात आचार्य आणि पुरोहित असे वर्ग दिसतात. या दोन संस्थांबरोबर केवळ संज्ञापकांचा एक वर्ग दिसतो तो सनकादि आणि श्री नारदांपासूनचा. या आचार्य, पुरोहित आणि नारद परंपरांचे वर्तमानातील अवशेष म्हणून अनेकानेक संस्था आपल्याला दिसतात. यांच्यामुळे भारतीय लोकपरंपरेतील लोकधर्माचे लोकबंध नवनवी रूपे धारण करीत प्रकट होतच राहिले.

ऋषींनी लाखो वर्षांच्या अनुभूतीसंचितातून, लोकभाषांचा ज्ञानभाषास्वरूपात उपयोग करून शारीरमाध्यमाच्या आधारे मंत्रसामर्थ्य सिद्ध केले. तसेच योगसामर्थ्य सिद्ध केले. त्याआधारे पंचमहाभूतात्मक पर्यावरण अर्थात वायू, जल, ऋतुचक्र, सूर्य व ज्योति उर्जा आदींच्या भौतिक शास्त्रीय व्यवस्थापनाच्या परंपरा निर्माण केल्या. त्याचबरोबर अवकाश देवता, अंतरिक्ष देवता, पंचमहाभूतात्मक देवता, प्रवाह, पर्जन्य, वृक्षवेली, वनस्पती, जलचर, भूचर, खेचर, जीव या सर्वांचे मानवी जीवनाशी संबंधित प्रकटलेल्या परंपरागत झालेल्या लोकबंधांना तंत्रात्मक, यंत्रात्मक, मंत्रात्मक आकार देऊन, यज्ञसंस्थेच्या सहाय्याने नियमित करून मानवी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, मानसिक जीवन व्यवहाराचे व्यवस्थापन करून; प्रगत व्यवस्थापित असा भारतीय लोक अर्थात वैश्विक लोक निर्माण केला. ऋषीलोकांनी निर्माण केलेल्या व्यवस्थापित प्रणाली, वास्तविक लाखो लाखो वर्षांच्या लोकजीवनाच्या सामूहिक नैसर्गिक व निसर्गाश्रयी जीवनसारणीचे वाङ्मयीन आणि सारणीस्वरूपातील व्यवस्थापन होते. हा वैदिक धर्म एका बाजूला गावगाडा अर्थात ग्रामव्यवस्था आणि व्यापक स्वरूपात राजशकट अर्थात राजव्यवस्था यांच्या स्वरूपात आणि देव, दानव, मानव यांच्या वृत्तीप्रवृत्ती गुणात्मकतेने ओळखून व्यवस्थापित झाला होता. **या सनातन धर्माचे, नैसर्गिक परंपरागत लोकधर्म आणि त्यातून निष्पन्न वैदिकधर्म असे दोन अवस्थांतील परंपरागत स्वरूप, आजतागायत आपण लोकवाङ्मयाच्या स्वरूपात अनुभवत आहोत. या दोन अवस्थात, वर्तन – परिवर्तन – व्यवस्थापन – पुन्हा वर्तन... असा क्रियाप्रतिक्रियात्मक अनुबंध असतो. ह्या अवस्था द्वंद्वात्मक नसतात तर सामरस्यात्मक असतात. याचेच वर्णन विष्णूतत्त्वाच्या म्हणजे लोकबंधाच्या 'अतोऽस्मि लोके वेदेच!' या स्वरूपाचे असते. यात अनार्य–आर्य, लोक–अभिजन, अवैदिक–वैदिक असे दोन भिन्न समूह नसतात, नव्हते, नाहीत हे लक्षात घेतले तरच भारतीय लोकधर्म हा वैदिकधर्म होय व आजचा हिंदू धर्मच होय हे लक्षात येईल.**

ऋषीलोकांच्या ज्ञान संकलन, संशोधन, संपादन, ग्रथन, पुनःप्रकटन आणि परंपरात्मकतेने पुन्हा लोकसंचित स्वरूपात प्रचलन होते. हे भौतिक, अध्यात्मिक आणि मानव्यशास्त्रे या तीनही प्रकारचे होते व आहे. त्याच परंपरा चौदा विद्या, चौसष्ट कला स्वरूपात प्रामुख्याने भारतभूमीच्या कानाकोपऱ्यात जात, जमात, वर्ण, आश्रम, ग्राम, नगर, महानगर, क्षेत्र, राज्य या सर्व अवस्थांत परंपरेने आणि अभिजाततेने वाङ्मयीन आणि शाब्द स्वरूपात जीवनसुलभता आणि मानवी पुरुषार्थ संदर्भात प्रकट होत आहेत. तसेच त्यांचे विविध अवतार विश्वभर दिसत आहेत. कारण भारतीय लोकधर्माचे उद्गाते ऋषीलोक विश्वात्मक दृष्टीनेच लोकधुरीण स्वरूपात संशोधन आणि व्यवस्थापनाचे कार्य करीत होते. सत्य अथवा कृत, त्रेता आणि द्वापार युगात असंख्य ऋषी आपापल्या परीने हे कार्य असंख्य ठिकाणी, असंख्य गुरुकुलात, आपली गुरुपरंपरा आणि अनुयायी परंपरा यांचे सहाय्याने करत होते. मौखिक परंपरेने सुरू असलेल्या या कार्याचे ग्रंथनिविष्ट व्यवस्थापन करण्याचा अतिमहत्त्वाचा व पुढील काळास उपयुक्त असा उद्योग ज्यांनी केला त्यात ठळक असे तीन प्रयत्न कलियुगातील आरंभ काळापर्यंत दिसतात ते म्हणजे १) वैदिक परंपरा अर्थात सप्तर्षी वाल्मिक आणि व्यास, जैमिनी आणि आर्यचाणक्य, शंकराचार्य आणि श्री ज्ञानेश्वर. वेद, संहिता, बाहमणे, आरण्यके, उपनिषदे, दर्शने, उपवेद, मीमांसा पुराणे, वेताळपंचवीशी, सिंहासनबत्तीशी, चंद्रकांता इ. कथा साहित्य यांतून हे ऋषीज्ञान शास्त्रीय मांडणीसह कथात्मकतेने प्रस्तृत झाले आहे. २) बौद्ध व जैन, चार्वाक परंपरा. ३) लोकपरंपरा हे होत.

ऋषी कार्याचे हे लोकसंचित गुरुकुलांमधून अर्थात व्यासपीठाकडून लोकपरंपरेत आणण्याचे कार्य पुरोहित वर्गाने केले. या पुरोहित वर्गात तीन वर्ग समाविष्ट आहेत.

१) कीर्तनकार, पुराणिक, कथाकार इ. चा वर्ग नारद शुकशौनक यांपासून ते आजच्या कीर्तनकार, वासुदेव, पांगूळ, चित्रकथी, बहुरूपे अशा व्यक्ती व समूहगत संस्था तसेच महाराष्ट्रातील ललित, भारुड, बोहाडे इ. सारख्या अक्षरशः हजारो संस्था भारतात सर्व प्रदेशात समाजातील सर्व घटकांच्या आश्रयाने आढळतात.

२) दुसरा वर्ग प्रत्यक्ष विधिविधानात्मक व कलात्मक कथाकीर्तनासह पौरोहित्य करणारा भिक्षुक वर्ग समाजातील यजमानापर्यंत पोहोचून काम करणारा. यातही तीन प्रकारे पौरोहित्य व विधिविधाने करून विधीकर्म करणारे आढळतात १) वैदिक पद्धतीने पौरोहित्य किंवा भिक्षुकी करणारांचा यज्ञसंस्थेशी निगडित वर्ग २) पुराणांशी निगडित व्रते पूजाविधी इ. यज्ञसंस्थेतून उद्‌भवलेल्या पुरोहितांचा वर्ग ३) यातू क्रियात्मक मंत्र, तंत्र, तोडगे, विधिविधाने इ. करणारांचा वर्ग. या तीनही वर्गात आज आपणास लोककलावंतांच्या परंपरा, धर्मधारणांसह कला सादरीकरण करतांना दिसतात. जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा भारतीय संस्कार परंपरा, सणोत्सव, यात्रा, जत्रा यांच्या निमित्ताने लोकजीवनात अविभाज्यपणे धर्मप्रसाराचे कार्य या सर्व संस्था करीतच आहेत.

भारतीय लोकधर्माच्या प्रचारातही केंद्रस्थानी, परब्रह्म, महासरस्वती महालक्ष्मी, महाकाली, ब्रह्मा, विष्णू, महेश अशा त्रिशक्ती व त्रिदेव, विविध पंचमहाभूतात्मक देवता व त्यांच्या उपदेवता किंवा अवतार देवता यांतून भारतीय लोकधर्माप्रमाणे सर्वाभूती चेतना, परमेश्वर पाहण्याच्या स्वभावातून प्रकटलेल्या स्थानिक, क्षेत्रिय, पुराण आणि वैदिक देवता, अशा सर्व देवता केंद्रस्थानी असतात. त्याचबरोबर राजा, मातापिता, गुरु, भूदेव, संत, सिद्ध, पुरोहित यांना व अतिथीलाही देवत्व बहाल केलं आहे. दानवातील दैत्य परंपरेलाही देवत्व दिलेले असून मृतात्म्यांनाही देवत्व दिले आहे. एकूण भारतीय लोकधर्माच्या केंद्रस्थानी 'आस्तिक' श्रद्धा भावनेसह दैवते असतात हे उघड आहे.

३) तिसरा वर्ग शास्त्रकारांचा अथवा पंडितांचा – मानवी जीवनाच्या सर्व व्यवहारांच्या संदर्भातील शास्त्रीय व्यवस्थापनाचा विचार 'आस्तिक' आणि 'नास्तिक' मतप्रणालीत येतो. त्यांच्या व स्मृतिग्रंथाच्या आधाराने व सामाजिक



व्यवस्थेविषयी वर्णाश्रम व्यवस्थेसह राजकीय, सामाजिक, संरक्षणविषयक, न्यायविषयक आणि भौतिक व अतिभौतिक ज्ञान प्रक्रियेविषयीचा आचारधर्मासह परंपरा व शास्त्रीय नीतीनियम सांगण्याचे कार्य हे लोक करीत असते.

मात्र या लोकांच्या परंपरा पुरोहित वर्गात मिसळलल्या दिसतात. यात न्याय, वैद्यक, ज्योतिर्विज्ञान, अर्थशास्त्र, विनियम यांचेही नीतीनियम प्रसारित करण्याचे होत असे उदा. गावांतील पुरोहित वैदिक धर्मविधी पूजापाठ, व्रते, उद्यापने करी, पुराणकथाकीर्तन करी, वैद्यक व्यवसाय करी, आचार्य म्हणूनही कार्य करी त्याचबरोबर ज्योतिर्विज्ञानही पाही आणि यातुक्रियात्मक तोडगेही सांगे.

याचा अर्थ या तीनही प्रकारांमध्ये निश्चित व्यवसाय बंधने नव्हती. यातूनच लोकपरंपरेची वैदिक परंपरेशी एकात्मकता दिसते.

वरील तीन प्रकारांशिवाय भारतीय लोकधर्म प्रसाराचे महत्त्वाचे कार्य व्यापारउदीम करणाऱ्या भटक्या किंवा प्रवासी संस्थांनी आणि राज्यविस्ताराच्या निमित्ताने जाणाऱ्या सैन्यातील लोकांनी केले आहे याचे असंख्य संकेत पहावयास मिळतात.

या प्रसार प्रक्रियेत पुरोहित वर्गांतर्गतच संगीत अर्थात नर्तन, वादन, गायन परंपरा अविभाज्यपणे धर्माश्रयाने, दैवताश्रयाने, मंदिराश्रयाने आल्या आहेत. सांस्कृतिक परंपरा म्हणून त्याकडे पाहिले जाते. वास्तुकला, चित्रकला, शिल्पकला याही ऋषीपरंपरेतूनत विकसित झाल्या.

या सर्व विवेचनाचा संक्षेपाने विचार करावयाचा तर आज दृष्यमान अशा ज्ञान, विज्ञान, कला परंपरांच्या अर्थात समग्र भारतीय लोकधर्माच्या जडणघडणीच्या मुळाशी ऋषीलोक आणि ऋषीकुलाचे कार्य आणि लोकपरंपरेत सेंद्रियत्वाने या ज्ञान विज्ञान कला प्रकटन आणि जतन करण्याची स्वाभाविक वृत्ती या दोन गोष्टी आहेत.

*

# ७. भारतीय लोकधर्म स्वरूपाच्या – परिवर्तनात्मक वर्तमानातही प्राचीनतम सनातन परंपरांचा प्रभाव

भारतीय लोकधर्म परंपरेवर गत दोनशे वर्षात प्रचंड प्रमाणात परिवर्तन झाले असे नमूद करावे लागते. त्याचे सहज उदाहरण म्हणजे जागरण विधी खंडोबाचा किंवा पितृदेवतेचा आणि गोंधळ विधी शक्तीदेवतेचा. मात्र गेल्या पंचवीस वर्षात ह्या दोन्ही भिक्षुक मंडळ्या व्यवसायाच्या भूमिकेतून जागरण गोंधळ एकत्रित मांडून स्वतःच्या व्यवसायाबरोबर यजमानाचा वेळ, पैसा सारे काही वाचवतात. कोणत्याही संस्कारात्मक विधीत्मक वा अन्य समारंभप्रसंगी होणारा डी.जे.चा वापर, न्यायसंस्था, शिक्षणसंस्था, वैद्यकीय व्यवसाय, तीर्थक्षेत्र विकास, ग्राम, शहर, नगर यांतील आलेले लोकशाहीनिष्ठ परिवर्तन, दळणवळणाविषयी संकेत विचार इ. कार्यमग्नतेसाठीची शिफ्ट प्रणाली इ.इ.इ. भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात स्वीकारलेल्या राज्यघटनेवर शासकीय व्यवस्थापनावर ब्रिटीश प्रणालीचा प्रभाव, औद्योगिक आणि वैज्ञानिक क्रांतीमुळे बदललेल्या धारणा, औद्योगिक प्रगतीने आणलेल्या सर्व ज्ञान शाखा, व्यवहार शाखा यांत आणलेल्या आधुनिक, यांत्रिक, इलेक्ट्रॉनिक साधनप्रणाली यामुळे भारतीय लोकधर्म म्हणून समग्र लोकजीवनात असलेल्या परंपरा विधिनिषेध खरोखरी परिवर्तीत झाले आहे असे वाटते. भारतीय लोकधर्म म्हणून जो सनातन व्यापक लोकबंध आहे – ज्याचा उल्लेख यापूर्वी आपण केला तो बाधित झाला आहे असे वाटते. वस्तुस्थिती वेगळीच आहे.

भारतीय लोकधर्माच्या जडणघडणीच्या लाखो वर्षांच्या इतिहासात अशी संक्रमण अवस्था नित्याचीच आहे. या प्रवासात दोनशे वर्षे नगण्य आहेत; हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. दुसरे म्हणजे भारतीय लोकधर्माचा केंद्रबिंदू लोकच्या उपरोक्त त्रिविधतेतील परमात्मतत्त्वाची सर्वात्मकता ही आहे. तो



केंद्रबिंदू हे लाखो वर्षांचे प्रातीभ ज्ञानात्मक, मानसिक, शारीरिक, आत्मिक प्रचलन आहे. ते कधीच बदलले नव्हते आणि श्रद्धापूर्ण जीवन आविष्काराच्या प्रत्यक्ष दर्शनाने ते बदलले नाही तर अधिक दृढ झाले आहे आणि ते बदलणार नाही असा जागतिक मानसिक विश्वास व्यक्त होत आहे. भारतीय लोकधर्म तत्त्वज्ञानाचा गाभा आणि त्याचा भक्तिसंप्रदायाच्या परंपरेतून आविष्कार यांचा स्वीकार जागतिक पातळीवर होत आहे. भारतीय लोकधर्माची वैश्विक भूमिका स्वागतार्ह आणि स्वीकार्य तसेच अनुकरणीय झाली आहे. एकप्रकारे वैश्विक लोकधर्माचा मूळ स्रोत भारतीय लोकधर्मात गवसल्याचा साक्षात्कार पाश्चात्य विश्वाला होत आहे. मग परिवर्तन दिसते ते कशात? हे परिवर्तन संस्थात्मक आणि व्यवस्थात्मक तपशीलात आहे. वर्तनातील साधन प्रणालीत आहे. मात्र आत्मिक आणि मानसिक पातळीवरील आस्तिक्यभाव, दैवते, श्रद्धा, त्यागपूर्णता, सेवाभाव, प्राणी आणि वनस्पतीजीवन तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीविषयी पूज्य भाव; वैज्ञानिक दृष्टिकोनासह अधिक घट्ट होतो आहे. तो घट्टपणे ऋषी संस्कृतीतून प्रकटणाऱ्या भारतीय लोकधर्माचा गाभा होता. भारतीय लोकधर्म देव आणि दानव यांना मानव्याच्या भूमिकेत अनुभवून त्यांच्या वृत्तीसंघर्षावर मात करीत सहिष्णुतापूर्ण सामंजस्याने, सामरस्याने, परमश्रद्धेने अखिल विश्वातील जीवनात्र आणि वस्तुमात्र यात परमात्मतत्त्वाचा स्वतःत अनुभव घेत सहानुभूती स्वरूपातील लोकबंधाची प्रस्तृती आणि परंपरा निर्माण करणारा, सर्व शाब्दज्ञानाला ॐ या एकाक्षर ब्रह्मांत कळवून ज्ञानविज्ञानयोग साधीत निष्काम कर्मतेने, भक्तिमार्गाने जाणारा तेजस्वी चैतन्यशाली धर्म आहे हेच वारंवार सिद्ध होते आहे.

*

# ८. आर्षमहाकाव्याप्रमाणे भारतीय लोकधर्माचे स्वरूप आर्ष

वाल्मिकी ‘रामायण’ आणि व्यासकृत ‘महाभारत ही भारतीय अतिप्राचीन आर्ष महाकाव्ये होत. देव, दानव, मानव यांचे परस्परसंबंध ‘लोकबंध’ श्री विष्णूंचे दशावतार यांच्या कथा मीमांसा धर्मकर्ममीमांसेची लोकधर्मीय चर्चा यादृष्टीने ही आर्ष महाकाव्ये जंबुद्वीपाच्या लाखो वर्षांच्या परंपरेतून प्रकटलेल्या समग्र आर्ष लोकधर्माचे दर्शन घडवितात. भारतीय लोकधर्माची एकूण परंपरा, जडणघडण आणि स्वरूप आर्ष महाकाव्यांप्रमाणे मानव्यकेंद्री, सर्वसमावेशक आणि सर्वनिरपेक्ष न्यायात्मक तत्त्वांसह मानव्यव्यवहार साधणारा आहे. भारतीय लोकधर्माचा तो मार्गदर्शक स्थायी गाभा आहे. म्हणूनच रामायण-महाभारतातील सर्व पात्रे भारतीय उपखंडातील नद्या, नाले, डोंगरदऱ्या, रानेवने, गावे नगर, महानगरे, वृक्षवेली यांना मानव्यासह इतिहासाचे भाग बनवतात. लोकबंध म्हणून भारतीय लोकधर्माची पारंपरिकता जपतात. लोकजीवन, कलाजीवन, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व्यवहार, राज्यरक्षण, राज्यविस्तार, मानवी मनाची नैतिकअनैतिकता, उत्तुंगता आणि शुद्रता प्रदर्शित करतात. लोकजीवनाचे भरणपोषण करण्याची पात्रता त्यांच्यात आहे. वाङ्मयीन प्रतिमा बनून एकप्रकारे भारतीय लोकजीवनाचे संतत, प्रवाही आणि चिरंतन रूप स्पष्ट करतात. भारतीय लोकधर्माने आलेली सांस्कृतिक धार्मिक आक्रमणे आपल्या कवेत घेऊन आपल्या प्रभावाने त्या प्रवाहांना भारतीय लोकधर्माचे परिमाण या आर्ष महाकाव्यांनी दिले आहे. त्यामुळे आज ज्या तथाकथित धर्मनिरपेक्षतेचा, मानव्य धर्माचा उल्लेख आवर्जून केला जातो; सत्य, शिव, सुंदर किंवा सत्, चिद्, आनंद यांची चर्चा केली जाते. विश्वव्यापक भूमिकेची आणि सत्य न्यायनिष्ठेची चर्चा केली जाते ती सर्व विचारसूत्रे, पारंपरिक लोकबंधांसारखी कथात्मक आशयासह आणि मानव्यदर्शनासह



भारतीय लोकधर्मात परंपरागत आहेत. सनातन चैतन्यतत्त्वाने एकूण वैश्विक मानव्य-एकात्मतेचे दर्शन आणि पूजन करणारा भारतीय लोकधर्म; आपल्या प्रकृतीधर्मासह; श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या ‘पसायदान’ प्रार्थनेत धर्मसंहितेसारखा अवतरित होतो.

*

# ९. आस्तिक, परिवर्तनवादी धुरेचा बैसणा ज्ञानोबा माझा

*विश्वाचे आर्त माझ्या मनीं प्रकाशलें ।*
*अवघेंचि जालें देहब्रह्म ।।१।।*
*आवडीचें वालभ माझेनी कोंदाटलें ।*
*नवल देखिलें नभाकारगें माये ।।२।।*
*बापरखुमादेवीवरू सहज निटु जाला ।*
*हृदयीं नटावला ब्रह्माकारें ।।३।।*

मनात 'विश्वाचे आर्त' प्रकाशलेल्या, श्री संत ज्ञानेश्वर महाराज 'माऊलीं'चा प्राप्त परिस्थितीत; पुन्हा पुन्हा विचार करणे भाग पडते. श्री ज्ञानेश्वरांची दृष्टी एवढी विकसित पावली होती; की त्यांना अवघी सृष्टी स्वतःत आणि स्वतः अवघ्या सृष्टीत, सहानुभूत होऊनच; सृष्टी अस्तित्वाचा भोग, भाग्य, याविषयी विचार स्फुरत असे. असा ब्रह्मांडाचा अवघा विचार; हा श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या सर्वसमावेशक जीवनदृष्टी-विचाराचा गाभा आहे. अभेदमूलक, सामरस्यपूर्ण जीवनसारणी हा, या जीवनदृष्टीचा कर्ममार्ग आहे. म्हणूनच श्री ज्ञानेश्वरांचा विचार प्रत्यही, परिवर्तन प्रक्रियेत, प्रेरक ठरतो.

१. श्री ज्ञानेश्वर 'माऊलीं'नी अध्यात्मिक लोकशाहीचा पाया घातला; असे गौरवाने आणि प्रचलित लोकशाहीसमाजवादी राज्यव्यवस्थेसंदर्भात, सोयीस्करपणे, गहिवरलेपणाने म्हटले जाते. विभूतिमत्त्वाला दिव्यत्त्व बहाल करून; हवे तसे वागण्याचे स्वातंत्र घेण्याचा, तो प्रवृत्तीपर छंद असतो. मुळात श्री ज्ञानेश्वर माऊलींना, केवळ, कैवल्याच्या करुणापूर्ण संवेदनेसह, जीवनसारणी चराचराच्या ठायी अवतरावी, असा ध्यास होता; हे लक्षात घेतले पाहिजे.

श्री ज्ञानेश्वरांच्या 'आत्म'प्रवृत्तीसह, जीवजगताच्या व्यथावेदनांच्या सहानुभूतीतून, अवघ्या 'लोक'च्या उद्धाराच्या कळवळ्याने, त्यांचे विचार



आत्मनिवेदनात्मक स्वरूपात स्फुरत असत.

१.१. श्री ज्ञानेश्वरकालीन समाजव्यवस्थेत डोकावले तर; विषमतामूलक अत्यंतिक जातिव्यवस्था आणि वर्णविद्वेषाचा अतिरेक, अंधविश्वासपूर्ण रूढीग्रस्तता, आर्थिक क्षेत्रातील वतनदारी, राजव्यवस्थेतील अंधपारंपरिकता; यांही पलिकडे म्हणजे, या सर्वांवर असलेले, धर्मसंस्थांचे वर्चस्व दिसते. मुघलसत्ता आणि पाचशाह्यांत विभागलेली राजवट, या धर्म आणि राजकीय दृष्ट्याही परकीय राजसत्तांची, समाजाच्या सर्वांगीण जीवनाला, सर्व प्रकाराने झळ पोहोचत होती. स्वार्थपरता, अनाचार, दंभाचार आणि भ्रष्टाचार यांमुळे अवघा समाज नागवला जात होता. एवढेच नव्हे तर या अवस्थेत समाज स्थितिशील बनत होता. अशा स्थितिशील आणि कुंठित तथा अवगुंठित समाजाला, प्रामुख्याने मानसिक पातळीवर प्रवाहित करून; समाजाचे आंतरजीवन समृद्ध करण्यासाठी, सर्वस्पर्शी समत्व दृष्टी आणि सामरस्य निर्माण करणारी वाट दाखविणे आवश्यक होते. श्री ज्ञानेश्वरांच्या कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाला तर जगानेही नाकारले गेले; येथपर्यंत मानव्याचा लोप झाला होता. त्यामुळे तेवढ्याच तीव्रतर आत्मसंवेदनेतून, श्री ज्ञानेश्वरांचे आत्मनिवेदन, समत्व आणि सामरस्य निर्माण करणारी वाट दाखवत होते. जनसामान्य बहुसंख्यांक, या अतिशोषित अवस्थेचे बळी ठरले होते; म्हणूनच श्री ज्ञानेश्वरांच्या आत्मनिवेदनाला जनमानसाचा प्रतिसाद मिळाला. श्री ज्ञानेश्वर 'माऊली' असल्याची जाणीव स्फुरली. या संदर्भात 'डंका' कवितेत कविवर्य 'बीं'नी श्री ज्ञानेश्वर माऊलींना 'बडा बंडवाला' संबोधले आहे. सामाजिक आणि राजकीय जीवनातही 'यदा यदा ही धर्मस्य...' विचारातील 'अवतार' या श्रद्धापूर्ण आश्वासकतेपेक्षाही, भौतिक जीवनातील 'बंडवाला' अधिक वास्तव आणि मानवी कर्मनिष्ठा आणि कर्तृत्व या दृष्टीने उद्बोधकही वाटतो.

अंतरमुख होऊन 'लोकशाही, समाजवाद' राज्यघटनेत स्वीकारून राज्यशकट चालविणाऱ्या राजकीय व्यवस्थेतील सत्तामार्गी व्यक्तींची आणि भोक्त्या आणि सोसत्या प्रजेची, स्थितीगती श्री ज्ञानेश्वरकालीन स्थितीगतीशी मोठ्या प्रमाणावर मिळतीजुळती आहे. केवळ तपशील बदलले आहेत इतकेच! हे ध्यानात घेतले; तर श्री ज्ञानेश्वरांच्या प्रबोधक विचारांचा विचार पुन्हा पुन्हा करावा लागतो.

१.२.

*वेदु संपन्नु होय ठाईं । परी कृपणु ऐसा अनु नाही ।*
*जे कानीं लागला तिहीं । वर्णांच्याची ।।*

(१४५७।। ज्ञा. अ. १८)

*म्हणौनी वेदाची सुसेव्यता । ते हे मूर्त जाण श्रीगीता ।*
*श्रीकृष्णें पांडुसुता । उपदेशीली ।।*

(१४६६।। ज्ञा. अ. १८)

वेदपूर्व काळापासून वेदोत्तर कालौघाच्या व्यासपर्वापर्यंत, अर्थात व्यासांनी वेदांच्या परंपरांचे संपादन करेपर्यंत; वेदज्ञानविषयक, दान आणि अर्जन परंपरेतही, एवढी रूढीग्रस्तता जीवनसारणीर आली होती; की व्यासांना आर्षमहाकाव्य महाभारतात, धर्मकर्ममिमांसा करता नाकीनऊ आले. म्हणूनच व्यासांनी वेदोपनिषदांचे सार स्वरूप अशी भगवद्गीता श्रीकृष्णमुखाने श्री अर्जुनास ऐकवून वेदज्ञान सर्वगत केले. वेदोपनारायणाला जे अभेदत्त्वाने अद्वैत ज्ञान प्रस्तुत करावयाचे होते; त्यासाठीच्या ज्ञानप्रक्रियेलाही रूढीग्रस्ततेने बाधित केले. तेच कार्य, नारायणाने भगवद्गीतेच्या निमित्ताने 'वेदान्त' ज्ञानापर्यंत घेऊन जाणाऱ्या सर्व मार्गांचे यथोचित विवेचन करून भगवद्गीता रूपाने केले. म्हणूनच ज्ञानेश्वरांना, 'व्यासोच्छिष्ट जगत्रय' म्हणून श्री व्यासांचा गौरव करावासा वाटला. श्रुतींचे, स्मृतिसारणीतील हे बाधितपण, कालौघात सारणीव्यवस्थेत, या ना त्या रूपाने, नेहमीच प्रकट झाले आहे. कधी या बाधितपणाचे उग्ररूप प्रकट झाले आहे. श्री पूज्यपाद शंकराचार्यांनी सर्वसमावेशक वेदान्त प्रणित सारणीचा उद्घोष करीत; सामरस्यासाठी केलेला आग्रही प्रयत्नही, श्री व्यासांसारखाच म्हणावा लागेल. संक्रमण अवस्थांच्या युगात, श्रीमद्शंकराचार्यांच्या विश्वव्यापक विचाराच्या प्रसार साधनेला एवढी बाधकता आली; की शंकराचार्य प्रणित धर्मालाही; धर्मसिंधु अथवा तथाकथित धर्मशास्त्राचा वापर न्यायनिवाड्यासाठी करणाऱ्या तथाकथित धर्ममार्तंडांनी, लोकसारणीला मानव्यधर्मापासूनच वंचित केले. उपनिषदातील महावाक्यांनी प्रसिद्ध झालेल्या वेदान्त तत्त्वज्ञानालाही; फासांनी करकचून आवळण्याचे कर्मठपण आकारले. 'वेदु कृपणु झाला' असे म्हणण्याशिवाय पर्याय राहिला नाही. वेदान्तप्रणित समत्व व सामरस्यपूर्ण लोकजीवनसारणीचा ध्यास घेऊन लोकशिक्षकाच्या भूमिकेतून; जगद्गुरु श्रीकृष्णांनी उद्घोषित केलेले ज्ञान श्री ज्ञानेश्वरांनी तत्कालीन लोकभाषेत, विश्वव्यापक ममत्वाने आणि समत्वदृष्टीने प्रस्थापित केले आणि अध्यात्मिक लोकशाहीची घटनासंहिता स्वरूपात 'पसायदान' प्रार्थना विश्वात्मक परमेश्वरापुढे गायिली. हे ज्ञानेश्वरांचे आत्मनिवेदन जगद्वंद्य ठरले ते या भूमिकेमुळेच होय.

१.३. श्री ज्ञानेश्वरांच्या काळात विविध संप्रदाय, पंथ, मते यांचे एवढे प्राबल्य होते; की अतिरेकी अभिनिवेशाने त्यांचा अनुसार होता. त्या त्या संप्रदाय, पंथ, मत परंपरेतील गुरुशिष्य परंपरा, विधिनिषेध, मंत्र, तंत्र, यंत्र, उपासनाविधी, जप, व्रते, नवसादि यांना नको एवढे महत्त्व आले होते. होम, हवन, याग, यज्ञ आदि संस्थात्मक विधी मार्ग, उत्सव यांबरोबरच यातुक्रियात्मक मंत्र, तंत्र, यंत्र, आराधी, देवऋषी, मांत्रिक आदींना दैवतांएवढे महत्त्व प्राप्त झाले होते. शुभाशुभ, करणीकवटाळ, लागीरबाधा, भूत, प्रेत, पिशाच्च कल्पना यांनी समाजात भयग्रस्तता वाढली होती. शैव, शाक्त, नाथ, सिद्ध, योगी, साधू, संन्यासी यांबरोबर गाणपत्य, दत्त, वैष्णव, महानुभाव या पंथाचे अनुयायी, वैदिक आणि पौराणिक धर्मकर्म करणारे पुरोहित, ज्योतिषी, पोतराज, वाघ्यामुरळी, गोंधळी, वासुदेव, पांगुळ, जोगतीण, भाडळी, नंदीबैलवाले, मसणजोगी आदि संस्था धर्मकर्म, कुलधर्म, कुलाचार नावावर जगत होत्या. त्याचवेळी विविध उपाय, तोडगे, शूद्रदेवता उपासना मार्ग सुचवित होत्या. बौद्ध, जैन, चार्वाकादि नास्तिक मतांचा प्रभावही जाणवत होता. या सर्वांना धार्मिकतेच्या नावाखाली समाजजीवनात एक वेगळे महत्त्वाचे स्थान होते. त्यासंबंधी श्रद्धा, अंधविश्वास, झपाटलेपण जाणवत होते. व्रतोपासनेचे प्राबल्य तर एवढे होते की; हेमांद्रिपंडिताच्या नावावर असलेल्या 'चतुर्वर्गचिंतामणी' या ग्रंथात वर्षाकाठी एक हजार व्रतांची संस्थामांडणी सांगितलेली आढळते. हे कमी म्हणून की काय; सूफी संप्रदायाने पाय रोवून पिर, ऊर्स, संदल, पंजा, सवारी आदि गोष्टींचे महत्त्व; नाथ, दत्त आदि संप्रदायामधील साधूंशी, संन्याशी, बैराग्यांशी साम्य दर्शविणारी परंपरा सुरू केली होती. या सर्व गोष्टींचा संबंध भौतिक जीवनातील दैनंदिन सुखदुःखे, लाभतोटा, यशापयश, प्रेम आणि वैर संबंध यांच्याशी, थेट विधिनिषेधात्मकतेने आणि वरील संस्थांच्या आदेशानुसार उपासना, नवससायास, गंडोदोरे इ.इ.शी, असल्याने पाखांड माजले होते. शाश्वत आनंद, मोक्ष मुक्ती, पारलौकिक चिरंतन सुख, आनंद यापासूनचे पारखेपण एकूणच समाजजीवनाला आले होते. स्पर्धा, असूया, सूड, संघर्ष, द्वंद्व यांच्या कचाट्यात अवघा समाज जखडला गेला होता, गुदमरला होता. नास्तिक मताचा बाजार मांडला गेला होता. मंत्र,

तंत्रशास्त्र आणि यंत्र, यातुक्रिया यांच्या प्राबल्याने एकप्रकारे दैवतांचे देव्हारे माजवून; आसुरी कर्मठपणात धन्यता मानणे सुरू होते. या पाखांडाविरुद्ध सशक्तपणे कोणी उभे राहाणे आवश्यक होते. नाथ संप्रदायिक तंत्रज्ञ, शाक्त तांत्रिक, मांत्रिक यात देव्हारे माजवण्यात अग्रेसर होते. मात्र गुरु गोरक्षनाथांनी या प्रचलित मार्गाचे हळूवार प्रबोधन करून नाथसंप्रदायाला भक्तिमार्गाचे वळण देण्याचा केलेला प्रयत्न; गुरु गहिनी, निवृत्ती यांच्या परंपरेने श्री ज्ञानेश्वरांनी अलगद स्वीकारला आणि या सर्व पंथोपपंथांना सन्मानपूर्वक, स्वागतशीलतेने स्वीकारीत, आपल्या अमोघ वाणीने, पाखांडखंडण करीत मार्गदर्शन केले. विविधतेतील एकता, श्रद्धापूर्णता, आस्तिक भाव जागृत केला. हे त्यांचे धार्मिक प्रबोधन अतिमहत्त्वाचे होते. मी 'संतांचिया संगे' या मोरया प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या माझ्या पुस्तकात याचा अधिक उहापोह केला आहे; तर पद्मगंधा प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या ग्रंथात या गोष्टीवर प्रकाश टाकला आहे. सर्व देवतांचे पूजन, उपासना महत्त्वाचीच असते. 'हठ'योग 'राजयोग' हे मार्ग मोक्षदायकच असतात. उपरोक्त सर्व मार्गांचे, मतांचे, संप्रदायांचे, पंथांचे ध्येय लोककल्याणच असते, हे लक्षात ठेवून; या सर्वांतून शाश्वत मार्ग निवडून, संशोधित आचरण करायचे असते. तात्कालिकतेतून शाश्वततेकडे माणसाचा प्रवास असला पाहिजे, यासाठी श्री ज्ञानेश्वरांनी नाथ परंपरेने आलेला गुरु गोरक्षनाथांचा मार्ग स्वीकारून 'मार्गाधारे वर्तावे । विश्व मोहरे लावावे ।।' चा ध्यास घेतला. गुरु गोरक्षनाथांनी शिवपद प्राप्तीसाठीचे तंत्रज्ञान इतके बेमालूम शरीरपिंडाशी जोडले की पाखांडखंडन आपसूकच झाले. उदा. शाक्त तांत्रिकाच्या पंचमकारांचे त्यांनी केलेले उन्नयन असे-

*मदो मद्यं मतिर्मुद्रा माया मीनं मनः पलम् ।*
*मूर्च्छनं मैथुनं यस्य तैनाऽसौ शाक्त उच्चते ।।*

(षष्ठोपदेश 'सिद्धसिद्धान्त पद्धती' श्लोक ५१) अर्थात मद हेंच मद्य, मति (मंथन) ही मुद्रा, माया (भ्रम) हाच मीन, मन हेच मांस, मूर्च्छा (ऐक्य) हेच मैथून; असे जो मानतो तोच खरा शाक्त होय. गुरु गोरक्षनाथांचा हा मार्ग, आत्मसंयम योगासारखा सर्वांना अनुसरण्याजोगा आहे; हे श्री ज्ञानेश्वरांनी लक्षात घेऊन मांडणी केली. श्री ज्ञानेश्वरांची ही सन्मान, स्वीकार, उन्नयन अनुसार करीत पाखंडखंडन करण्याची दृष्टी; पुढे सर्व संतांनी स्वीकारलेली दिसते. श्री ज्ञानेश्वर म्हणतात,



*वेद वाणी चांग स्मरतां स्मरण ।*
*नित्य नारायण हृदयी वसे ।।१।।*
*तेथील गव्हर जाणता विरुळा ।*
*ब्रह्मी ब्रह्मकळा साधुमुखे ।।२।।*
*जाप्य, जप होम बुद्धि विधान हरि ।*
*हृदयी श्रीहरि न कळे मूढा ।।३।।*
*ज्ञानदेव म्हणे श्रीहरि हृदयस्थ ।*
*ऐसी आहे भाष्य वेदशास्त्री ।।४।।*

(श्री. ज्ञा. अभंगगाथा)

दुसऱ्या एका अभंगात श्री ज्ञानेश्वर म्हणतात-

*बोलतां बोलु मावळला तो मावळोनि उरला ।*
*तरि हा भावों केंवि गमलारे बापा ।।*
*कीं इंद्रियांचा भोगु खुंटला कीं समंधि याचा ठावो निमाला ।*
*कीं वर्णावर्णुभला विचारू नाही ।।*
*तैसे आपुलेंचि करणें आपुलेंचि नवल ।*
*खेळ्या होऊन दावी रया ।।१।।*
*तपे अनेक विधी करावीं हे मनाची आधी ।*
*करितां करणे सिद्धी नव्हे नाहीं ।।*
*म्हणोनि वाऊगाचि वळसा पडे या धाडिवसा ।*
*तैसा कल्पनेचा फासा मायाबंधु ।।२।।*
*ऐसी याचा पाठी कां होसी हिंपुटी ।*
*न लगे तुज सुखाचा स्वादु या गोष्टी येणें ऐसेचि विचारी ।।*
*एकुचि धीर धरी न लगे या द्वैतासाठी रया ।।३।।*
*म्हणोनि डोळियांचें देखणें लाघव तो देखणा जाणे ।*
*तेथे आपपर पिसुणें न देखें कांहीं ।।*
*तें शब्देंविणे बोलतां निशब्दें ये हाता ।*
*ऐसा उपावो करी कांही ।*
*जोडिलिया धना वाढी बहू असें । तेथे वेचले न दिसे कांहीं ।।*
*बापरखुमादेविवरु विठ्ठलू चिंतिता सुखाचे नि सुखें राही ।*
*निवृत्तिरायाचे खुणा दाऊनियां सकळ पुनरपि येणे नाहीं ।।४।।*

श्री ज्ञानेश्वर माऊली अन्य मार्गांचे पाखांडपण सांगतांना शुभ लाभ तोटा

यांचा व्यावहारिक विचार मांडून; लोकांना वामाचारापासून परावृत्त करतात हे विशेष. उपरोक्त सर्व संस्था परंपरा मते यांत न अडकता सर्वांना सहज सुलभ असा नामस्मरण मार्ग श्री ज्ञानेश्वर सुचवितात. येथेही त्यांची समत्वाची दृष्टी आणि सामरस्याची सारणी मार्ग मंडन, आपले लक्ष वेधते. पंथनिरपेक्ष सहज जीवन जगण्याचा सुलभमार्ग तत्कालिन पंथोपंथात मार्गात जखडलेल्यांना आवश्यक होता.

२. श्री ज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभव', 'चांगदेव पासष्टी', 'हरिपाठ', 'अभंगगाथा' आणि विशेषतः 'श्री ज्ञानेश्वरी' या वाङ्मयाचे अद्वितीय पण, विविध प्रकारे मोठ्या प्रेमाने, पांडित्यपूर्णतेने, भाविकतेने, गहिवरलेपणाने झाले आहे. संत, तत्त्वज्ञ कवी म्हणून त्यांचे कार्य जगन्मान्य आहे. 'बोले, इंद्रिया लाभे कळभा' अशा स्वरूपाचे त्यांचे बोल सर्वांनाच साहित्य, तत्त्वज्ञान आणि भाष्य या त्रिविधतेने दिव्य अनुभूती देत आले आहेत. मात्र हे त्यांचे समग्र वाङ्मय, आत्मनिवेदन आहे; हे विशेषत्वाने लक्षात घ्यावे लागते. हे आत्मनिवेदन केवळ एका 'ज्ञानेश्वर' नावाच्या व्यक्तीचे नाही, तर समग्र 'लोक'चे आत्मनिवेदन, विश्वाचे आत्मनिवेदन होऊन प्रकटले आहे; हे समजून घेणे अधिक आवश्यक आहे. 'अनुभवामृत - रसरहस्य'कार, पु. य. देशपांडे 'आत्मनिवेदना'त लिहितात 'जो अनुभव आंतरिक आत्मवस्तूपर्यंत जाऊन पोचतो आणि स्वयंभू, स्वसंवेद्य अशा वस्तुप्रभेने उजळला जातो त्या अनुभवांचे निवेदन म्हणजे आत्म निवेदन.' श्री ज्ञानेश्वरांनी तर आत्मनिवेदन असे नाव न देता 'अनुभवामृत' असे नाव दिलें आहे - ''ज्ञानदेव म्हणजे श्रीमंत । हे अनुभवामृत । सेवूनि जीवनमुक्त । हेचि होतु ।।'' अशा शाश्वत असामान्य अमृतरूप अनुभवाची अनुभूती समस्त 'लोक'ला घडवून 'लोक' श्रीमंत करावयाचे होते हे स्पष्ट आहे. श्री ज्ञानेश्वरांच्या या अपेक्षेविषयी पु. य. देशपांडे पुढे लिहितात, 'मानवी जीवन म्हणजे असंख्य, अनेकविध व परस्पर विरुद्ध अशा अनुभवांचा समुद्रच असतो. या समुद्रांत ज्ञानाज्ञानरूपी, सुखदुःखरूपी, सत्य-असत्यरूपी, चित्रविचित्र व संघर्षमय अनुभवांचे मंथन सतत चालू असते. या समुद्रमंथनातून अनेक रत्नांबरोबरच हलाहलही बाहेर उसळून येते. किंबहुना, हे हलाहलच इतके प्रभावी असते की, समग्र मानवी जीवन त्याच्याच आहारी गेल्यासारखे भासते. जीवनातील हे प्राणघातक व सर्वसंहारक हलाहल जे पचवू शकतात त्यांनाच या अमृतमंथनातून अमृताची प्राप्ती होते. ज्ञानदेवांची तपःश्चर्या म्हणा, पुण्याई म्हणा अथवा भाग्य म्हणा, महाथोर म्हणून त्यांना हे



अमृत प्राप्त झाले; आणि त्यांचे औदार्य एवढे अपार की, हे अमृत सर्वांना उपलब्ध व्हावे म्हणून त्यांनी 'अनुभवामृत' हा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला.' ज्ञानदेवांनी आपल्या अपार औदार्याने वरदमुक्तहस्तांनी, हा ठेवा सर्वांना उपलब्ध करून दिला. समत्वदृष्टी आणि सामरस्य हा लोक प्रबोधनाचा मार्ग ही ज्ञानेश्वरांची अध्यात्मनिष्ठा होती; हे स्पष्ट आहे.

२.१. ज्ञान-विज्ञानाच्या संभ्रमात रूढीग्रस्ततेने अंध झालेल्या; भोवतालच्या अज्ञ आणि तथाकथित पंडित, महंत, अध्वर्यू, पीठाधीश, तंत्रज्ञ इ.इ.लोकांना, त्यांना या अमृतानुभवाचा अनुभव देऊन प्रबुद्ध आस्तिक करावयाचे होते. ही प्रतिती घडविणे हे 'दिव्य' होते. श्री ज्ञानेश्वरांच्या समत्त्व दृष्टीचा परिचय घडवून सामरस्यपूर्णतेचा मार्ग प्रशस्त करण्यासाठी 'स्वमत्वम् योगउच्चते' आणि 'योग कर्मसुकौशलम्' ही सूत्रे पुढे ठेवून योगीराज ज्ञानेश्वरांचे चमत्कार घडले हे ध्यानात घेतले पाहिजे-

*या उपाधिमाजीं गुप्त । चैतन्य असे सर्वगत ।*
*ते तत्वज्ञ संत । स्वीकारिती ।।*

(१२६ अ. २ ज्ञा.)

या तत्त्वाची प्रतिति, श्री ज्ञानेश्वर 'रेड्यामुखी वेद बोलवून', 'त्या जीवाला मारलेल्या आसूडाचे वळ स्वतःच्या पाठीवर प्रकटवून', 'पार्थिव भिंतीत चैतन्य अनुभूत करवून' देतात. आणि 'आस्तिक' ज्ञानाची प्रतिति योग मार्गाने सर्वगत करतात. स्वतःच्या पाठीवर मुक्ताईकडून मांडे भाजून घेतात; 'समत्वम् योग उच्चते' याचा वस्तुपाठ म्हणून या चमत्कारांकडे पाहाणे आवश्यक आहे. योग हे शारीर शक्तींसह मनोविज्ञान आहे, हे यासाठी लक्षात घेणे आवश्यक आहे. हा जादूटोणा नाही किंवा लोक भुलविण्यासाठीची ही 'नजरबंदी' नाही; हे लक्षात घेतले; तर चमत्कारांचा अर्थ, 'योग वैज्ञानिक प्रयोग' स्वरूपात घेता येतो.

श्री ज्ञानेश्वरांनी याच अनुभवामृताचा अनुभव घडविण्यासाठी श्री नामदेवांची कीर्तनगम्य आणि कीर्तनरम्य अशी अभंगबंधरचना स्वीकारली आणि तत्त्वज्ञ, योगी, संत ज्ञानेश्वर, मंदिरातील भाष्यकारवृत्ती सांडून, वाळवंटात भक्त मेळ्यात आले. श्री नामदेवांच्या बोटाला धरून तीर्थावळी केल्या. श्री नामदेव, जनाबाई, सांवता, गोरा, नरहरी, चोखा, बंका, सोयरा, कर्ममेळा या व अशा कितीतरी लोकसमुदाय प्रतिनिधींच्या मेळाव्यात कीर्तनरंगात रंगून गेले. 'योग कर्मसुकौशलम्' चा हा पाठ होता. गुरुपरंपरेचा नाथ संप्रदाय आणि श्री

ज्ञानेश्वरांचे हे लोकसागरातील असलेपण यात केवढे अंतर होते. 'अलौकिक नोहावे लोकांप्रती' ही 'लोक' सामरस्य वृत्ती त्यांना अनुभूत करावयाची होती. धारणातत्त्वाचे हे 'आस्तिक' तत्त्वज्ञानात्मक प्रात्यक्षिक होते, हे समजून घेतले पाहिजे. परिवर्तनासाठीचे प्रबोधन असे लोकी राहूनच करावयाचे असते.

२.२. समत्व साधनेचा, सामरस्याचा आणि शाश्वत आनंदप्रतितीचा अर्थात जीवनमुक्ततेचा सहजसुलभ मार्ग, परिवर्तन प्रक्रियेत धुरीणांने मांडणे, दाखविणे आवश्यक असते. म्हणूनच सहज सुलभ असा नामभक्तीमार्ग श्री ज्ञानेश्वरांनी सर्व प्रकारच्या कर्मठपणावर, रूढीग्रस्ततेवर, कठीण तपःसाधनेवर, पंथाश्रयी कर्मकांड, यांत्रिक, मांत्रिक, तांत्रिकाच्या मार्गावर उपाय म्हणून मांडला, सुचविला. श्री नामदेवांच्या 'नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञान दीप लावू जगी' हे सूत्र हाती घेतले. स्वतःच्या घराण्यात चालत आलेली वारीची परंपरा भगवी पताका खांद्यावर घेऊन स्वीकारली. लोकांना सुलभ हरिपाठ दिला.

**हरिपाठ –**

(१)

*देवाचिया द्वारी उभा क्षणभरी ।*
*तेणें मुक्तिचारी साधियेल्या ।।१।।*
*हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा ।*
*पुण्याची गणना कोण करी ।।२।।*
*असोनि संसारी जिव्हे वेगु करीं ।*
*वेदशास्त्र उभारीं बाह्या सदा ।।३।।*
*ज्ञानदेव म्हणे व्यासांचिया खुणें ।*
*द्वारकेचे राणे पांडवा घरी ।।४।।*

(२)

*चहुवेदी जाण साहीशास्त्री कारण ।*
*अठराही पुराणे हरीसी गाती ।।१।।*
*मंथुनी नवनीता तैसे घे अनंता ।*
*वायां व्यर्थकथा सांडीं मार्गु ।।२।।*
*एक हरि आत्मा जीवशिव समा ।*
*वाया दुर्गमा न घालीं मन ।।३।।*
*ज्ञानदेव पाठ हरि हा वैकुंठ ।*
*भरला घनदाट हरि दिसे ।।४।।*



श्री ज्ञानदेवांनी अन्य दुर्गम मार्गात, अर्थात मंत्र, यंत्र, तंज्ञ, विधिनिषेध, होम, हवन, जप, तप, याग, व्रते इ. वाया वेळ न घालविता प्रपंच करता करता, चित्तशुद्धी, पुण्यप्राप्ती, मनोस्थैर्य आणि समाधानाचा मार्ग सर्वांसाठी खुला केला.

२.३. यात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही नामभक्ती, ही, आपापला कुलधर्म, कुळाचार, पंथानुसार आणि जातपात यांच्या पलिकडे जाऊन; सहजतेने करता येते. त्यामुळे परंपरेला बाधा न येता, पंथ मार्ग जातपात निरपेक्षतेने आनंदाभूती घेता येते. श्री ज्ञानेश्वर म्हणतात–

**(२४) (हरिपाठ)**

*जप तप कर्म क्रिया नेम धर्म ।*
*सर्वां परीं राम भावशुद्ध ।।१।।*
*न सोडी रे भावो टाकी रे संदेहो ।*
*रामकृष्णी टाहो नित्य फोडी ।।२।।*
*जात, वित्त, गोत, कुळ, शीळ मात ।*
*भजेका त्वरित भावनायुक्त ।।३।।*
*ज्ञानदेवा जिणे नामेंविण व्यर्थ ।*
*रामकृष्णीं पंथ क्रमियला ।।४।।*

हा 'रामकृष्णपंथ' सर्व पंथ, मार्ग, जात, समाज, धर्म यांच्यापेक्षा वेगळा आणि समावेशक आहे.

ज्ञानेश्वरांच्या या 'सांगी'चा परिणाम एवढा झाला; की खरोखरीच अठरापगड जातीतले, पंथोपपंथातले, जातीपातीचे एवढेच नव्हे तर जैन, बुद्ध, शीख आदि मतांचे आणि मुस्लिम धर्मिय देखील या पंथनिरपेक्षतेने भारावून, रामकृष्णपंथ अर्थात भगवद्‌भक्तिमार्गात येऊन मिळाले. एवडेच काय महानुभावियांनाही कृष्णभक्तीची कास धरावी लागली. त्यांचे स्वरूप काही असो परंतु पंचकृष्णांमध्ये दत्तात्रेय आणि श्रीकृष्णांना स्थान देऊन एक प्रकारे महानुभावियांनीही अन्य पंथ निरपेक्ष पंथानुसरण केले.

२.४. आपल्या या 'रामकृष्णपंथ' प्रशस्तीचे श्रेय, अमृतानुभवाचे श्रेय श्री ज्ञानेश्वर श्री गुरुंना देतात–

*श्री गुरुसारिखा असतां पाठिराखा ।*
*तिरांचा लेखा कोण करी ।।१।।*
*राजयाची कांता काय भीक मागे ।*

*मनाचियें जोगें सिद्धी पावे ।।२।।*
*कल्पतरुतळवटी जो कोणी बैसला ।*
*काय वाणी त्याला सांगा जी जी ।।३।।*
*ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो ।*
*आता उद्धरलो गुरु कृपें ।।४।।*

(अभंगगाथा)

यांत श्रीगुरुंचा निर्देश थेट निवृत्तीनाथांपर्यंत पंथपरंपरेने घडत असला; तरी 'व्यासोच्छिष्ठ जगत्रय' म्हणत श्री व्यासांचा ऋणनिर्देश श्री ज्ञानेश्वर करतात. त्याचबरोबर गहनशास्त्रीय चर्चा करतांना योगेश्वर श्रीकृष्ण निवृत्तीदास आणि प्रामुख्याने जगद्गुरु श्रीकृष्ण यांचा निर्देश ते आवर्जून करतात. तेथेच ते थांबत नाहीत, 'भाष्याकाराते वाट पुसतु' असे म्हणत, भाष्य करताना श्रीमद् पूज्यपाद शंकराचार्यांचा थेट उल्लेख करतात. त्याचबरोबर गोरक्षनाथांनाही शिरोधार्य मानतात. या सर्व गोष्टींचा मतितार्थ असा की समग्र परिवर्तन प्रक्रियेत ते पंथनिष्ठ पंथनिरपेक्षता अनुसरतात, तसेच विभूतिमत्त्व निरपेक्षता अनुसरतात. रा. चिं. ढेरे 'सिद्ध सिद्धान्त पद्धती' या म. दा. भट संपादित ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात त्याप्रमाणे, 'परिणामतः महाराष्ट्रातला, नाथ संप्रदाय हा ज्ञानदेवांमुळे एक उदात्त आणि उन्नत स्वरूप पावला हे सत्य होय.'

३. गुरुपरंपरेला सर्वार्थाने सर्वाधिक महत्त्व देणाऱ्या श्री ज्ञानेश्वरांनी पंथपरंपरेशी बंडखोरी करून; भागवत संप्रदायाची मुहूर्तमेढ रोवली असे मात्र नव्हे. नाथ संप्रदायातच श्री गुरु गोरक्षनाथांपासून, परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झालेली पाहावयास मिळते, हे वर उल्लेखित केले आहेच. विविध पंथ, मार्ग, मते यांतील कर्मकांडाला आलेले महत्त्व व त्यात एकप्रकारे अंधविश्वासाने नागवला जाणारा, वाहवत जाणारा समाज; या परंपरेतील संतांना पाहावत नव्हता. तांत्रिक आणि मांत्रिक या परंपरेत मोठ्या प्रमाणावर आलेली दांभिकता आणि वैदिक परंपरेत कर्मकांड विधिनिषेधाला आलेला उत, यांतून समाज बाहेर पडावा यासाठीची ही प्रक्रिया होती. मात्र केवळ, चारी भावंडांना या प्राप्त परिस्थितीचा जो टोकाचा त्रास सोसावा लागला, त्याचीच ती केवळ प्रतिक्रिया नव्हती. म्हणूनच विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन; ही प्रबोधनाची प्रक्रिया सुरू झाली होती. त्यांनी या परंपरेला केवळ पंथांतर्गत नव्हे; तर अधिक समावेशक असा आकार दिला. श्री ज्ञानेश्वरांनी श्री निवृत्तीनाथांच्या आज्ञेने आणि श्री संत नामदेवांच्या सहाय्याने, 'श्रीमद्भगवद्गीता' प्रमाण मानून हा आकार दिला. या पायाभूत प्रयत्नांमुळे, वेदप्रामाण्यांसह भक्तिसंप्रदायाला गती मिळाली आणि सहजच अतिरेकी कर्मकांड व पाखंडपण यांना थोपविण्यात काहीसे यश मिळून; समग्र समाज, सर्व वैविध्यांसह सहज सुलभ मार्गात एकवटण्याची प्रक्रिया सुरू झाली. आजच्या भाषेत, एक प्रकारे सर्वसमावेशक आस्तिक भावयुक्त अशा, अध्यात्मिक सारणीला सुरुवात झाली; म्हणजेच अध्यात्मिक लोकशाहीची स्थापना झाली!

'ज्ञान', 'आनंद' या गोष्टी, सर्वांसाठी सदैव खुल्या असतात. चराचरात सामावलेल्या चैतन्यतत्त्वाचा तो आविष्कार असतो. 'सत्‌चिद्‌आनंद' ही कोणाची मिरासदारी नसते. अध्यात्म साधना म्हणजे सत्‌चिदानंदस्वरूप होणे होय. व्यक्तिगत पातळीवर यासाठी साधना करून सायुज्यमुक्ति प्राप्त होते. मात्र धर्माचे उद्दिष्ट कधीही असे वैयक्तिक अशा मुक्तीचे, जीवनमुक्तीचे नसते. मानवी जीवनात तर व्यक्तिगत मुक्तीला स्थान नाहीच नाही. समूहसारणीला स्थान आहे. ही गोष्ट वैदिक परंपरेतील ऋषीगणांपासून मंडित होत आली आहे. धर्म लोकधारणेचे कार्य करतो. अध्यात्म ज्ञान धर्मतत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी असते. धर्मतत्त्वज्ञानाचा दुसरा भाग धर्मसारणी अर्थात लोकसारणी हा असतो. या लोकसारणीचे अंतिम लक्ष, सर्व 'लोक'ला ज्ञानात्मक अवस्थेपर्यंत नेऊन सत्‌चिदानंद प्राप्ती घडविणे, हे असते. म्हणूनच सारणीमध्ये व्यवहारात्मक आणि कर्मात्मक भाग हा साधनात्मक असतो. पुरुषार्थ कल्पना ही यातूनच निष्पन्न झाली आहे. नुकत्याच पद्मगंधा प्रकाशन, पुणे यांनी प्रसिद्ध केलेल्या माझ्या 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या ग्रंथात याविषयी मी सविस्तर चर्चा केली आहे. मुळात कोणत्याही तत्त्वज्ञानाचे मंडन केवळ त्या एका तत्त्वज्ञांसाठी नसते, ते लोकनिष्ठेनेच प्रस्तुत होते, हे लक्षात घेतले पाहिजे. वेदोपनिषदांचे तत्त्वज्ञान, त्यातील साधनामार्ग हे लोकनिष्ठेनेच प्रकट झाले आहेत. त्यातूनच लोकधारणाबंध लोकपरंपरेत येतात आणि धर्मस्वरूप प्रकटते. या प्रवासात पंथ, मते, मार्ग, उपासनापद्धती, कर्मकांड यांचे वैविध्य प्रकट होण्याची शक्यता मानवी स्वभावतः असते. अतिप्राचीन अशा भारतीय परंपरेत हे वैविध्य अनेकदा अनेक प्रकारे प्रकट झाले आहे. आस्तिक आणि नास्तिक परंपरा हे त्याचे फलित आहे. याच प्रवासात तांत्रिक, मांत्रिक, वैदिक, अवैदिक, पौराणिक, यात्वात्मक अशा अनेक परंपरा दैवतकल्पना, दैवतउपासना यांच्या आश्रयाने निर्माण होतात. याच प्रक्रियेत पाखांडपण, रूढीग्रस्तता, दांभिकता, भोंदूपणा, विधिविधानात्मक शोषण परंपरा, तोडगे, शुभाशुभ कल्पना अशा

असंख्य गोष्टी लोकधर्मात धर्माचा सारणीचा भाग म्हणून पुढे येतात. यांचा अतिरेक अंधपणाने होऊ शकतो. हेतुपूर्वक व स्वभावतः स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने हा अतिरेक होऊ शकतो. अवघा लोक या प्रक्रियेत नागवला जातो, शोषित होतो. यातून समाजाला बाहेर काढण्याचे कार्य लोकधुरिणांना करावयाचे असते. श्री ज्ञानेश्वरांनी पायाभूततेने गतिमान केलेली भागवत परंपरा ही या प्रक्रियेचा भाग आहे, हे लक्षात घेणे जरुरीचे आहे.

३.१. भगवत् भक्तिमार्ग अर्थात वारकरी अथवा वैष्णव परंपरा सुरू करण्यामागे, राजकीय परिस्थितीचा काही परिणाम होता काय? याचा विचार करणे आवश्यक वाटते. परकियांच्या आक्रमण काळात सैरभैर झालेल्या प्रजेला जर राजकीय आधार नसेल; तर एकप्रकारे अधिक भयग्रस्तता येते. श्री ज्ञानेश्वरांच्या काळात, ही सैरभैरता आणि भयग्रस्तता यांनी उग्ररूप धारण केले होते. यादवांच्या दुर्बलतेने, आपल्याला कोणी वाली नाही, असे वाटू लागले होते. परकियांच्या आधीन जाण्याची अपरिहार्यता निर्माण झाली होती. अशा वेळी राजकीय आश्रयापेक्षाही शाश्वत वाटणारा पारमार्थिक आधार श्री ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे यांनी समकालीन आस्तिक धुरिणांना बरोबर घेऊन निर्माण केला. समाजाचे मानसिक स्थैर्य टिकविण्याचे कार्य या संप्रदायामुळे होऊ शकले. श्री ज्ञानेश्वरांनी मांडलेल्या सर्वसमावेशक वेदान्त तत्त्वज्ञानातून आणि सुलभ भक्तिमार्गातून हे असलेपण भक्कमपणे टिकून राहिले. राजकीय सत्तानिरपेक्ष स्वरूपात भारतीय परंपरागत पुरुषार्थपूर्ण लोकजीवन भक्कमपणे उभे करण्याचे श्रेय श्री ज्ञानेश्वरांना जाते. पंथ, मार्ग, मत, जातपात, वर्णभेद या भेदात विभागलेला सनातन, आस्तिक 'लोक', भक्तिमार्गाने पुन्हा एकवटला आणि जिवटपणे टिकून राहिला. परकियांची चाकरी करावी लागली तरी; स्वत्त्वाचे आणि सत्त्वाचे भान विसरला नाही.


३.२. श्री ज्ञानेश्वर नामदेवोत्तर काळात श्री एकनाथांच्या रूपाने ही परंपरा परकीय राजसत्तेलाही प्रसंगी शहाणपण शिकवू लागली. श्री ज्ञानेश्वरांनी आणि नामदेवादी संत प्रभावळीने सुरू केलेली पाखांडखंडनाची परंपरा प्रखरतेने पुढे सुरू राहिली. समग्र लोक एकवटून उभे राहण्याचे आणि सर्वात्मपरमेश्वराचा अनुभव घेण्याचे महत्त्वाचे कार्य सुरू राहिले. ह्या कार्याचा कळसाध्याय जगद्गुरु श्री तुकारामांच्या रूपाने लिहिला गेला. समाजाला प्रबुद्धता येत राहिली. पाखांडखंडन होत गेले. बुसरटलेपणा नाहिसा होत राहिला. या पारमार्थिक प्रबोधक, परिवर्तनात्मक मार्गाचे, एक प्रकारे चळवळीत रूपांतर झाले. श्री संत तुकोबारायांच्या काळात शिवशाहीच्या रूपाने भारतीय राजकीय स्वत्वाचे पुनर्जागरण आणि भारतीय लोकधर्माची आस्तिक्य भावाने पुनःउभारणी झाली; हे श्री ज्ञानेश्वरांनी केलेल्या पायाभूत कार्याचे फलित होते, हे नाकारता येत नाही. पारंपरिक वर्णाश्रम पद्धतीतही, समत्व दृष्टीने, अभेदमूलक सामरस्याने जगण्याची पात्रता या भागवत चळवळीतून झाली. 'आम्ही वैकुंठ वासी । आलो याच कारणासी ।। बोलले जे ऋषी साच भावे वर्ताया ।।' या संत तुकारामांच्या घोषणेने वैदिक आस्तिक मताला, लोकधर्मीय परिमाण प्राप्त होण्याची, पुनरुत्थान प्रक्रिया घडली, हे नाकारता येत नाही.

श्री ज्ञानेश्वरांनी सुरू केलेली आस्तिक, परिवर्तनवादी चळवळ; समत्व दृष्टी आणि सामरस्य हा प्रबोधनाचा मार्ग या निश्चित दिशेने भारतीय लोकधर्माला आकार देत राहिली. कर्मयोग, सांख्यमत आणि भक्तियोग या आधारे ज्ञानविज्ञान समन्वयात्मकतेने, वैश्विक पातळीवर भारतीय ज्ञान पुनर्प्रस्थापित होण्याची प्रक्रिया यातून घडत राहिली. या सर्व प्रक्रियेची बीजे श्री ज्ञानेश्वरांच्या पसायदानात स्पष्ट आणि शुद्ध संशोधित स्वरूपात दिसतात. विश्वात्मक सामरस्यपूर्ण 'लोकजीवनाची संहिता' म्हणून 'पसायदाना'चा विचार करावा लागतो.

स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने स्वीकारलेली लोकशाही समाजवादी व्यवस्था मुलतः समत्व आणि सामरस्य यावरच आधारलेली आहे. या पद्धतीच्या मुळाशी आस्तिक मत दृढमूल आहे; कारण नास्तिक मतालाही अंततोगत्वा आस्तिक मताशीच येऊन मिळावे लागते. ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. आधुनिक विचारवंतांच्या विचारांची बीजे, या आस्तिक मताच्या श्री ज्ञानेश्वरांनी केलेल्या मंडन प्रक्रियेत सापडतात. कारण 'विश्वाचे आर्त मनी प्रकाशते'. आधुनिक भारताच्या जडणघडणीत, ज्या आधुनिक विचारवंतांचे मोठे योगदान आहे; त्या सर्वांना आधुनिक ज्ञानोबा-तुकोबा, नामा-एका, मुक्ता-जना-सोयरा असे संबोधणे गौरवास्पद होईल! सनातन भारतीय ज्ञानविज्ञान परंपरेचे पुनरुत्थान त्यांच्या विचारातून घडते आहे. या पुनरुत्थान चळवळीचे पायाभूत विभूतिमत्त्व म्हणजे श्री ज्ञानेश्वर महाराज होत.

*

# प्राचार्य डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांचा व्यक्ती-परिचय



| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | अनिल नागेश सहस्रबुद्धे |
| **जन्म** | : | २४ ऑगस्ट १९४७ (अकोले, अहमदनगर) |
| **शिक्षण** | : | टी.डी., बी.एड., एम.ए. (मराठी), पीएच.डी. (मराठी – चाळीसगाव डांगाण परिसर सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास) |
| **पत्ता** | : | 'आई', समर्थनगर, श्रीराम चौक,<br>(हॉटेल सागरच्या मागील बाजूस),<br>पाईपलाईन रोड, अहमदनगर. महाराष्ट्र.<br>दूरध्वनी (०२४१) २४२४१६७, भ्रमणभाष ९८८१५००९४२.<br>usahasrabuddhe@gmail.com |
| **नोकरी** | : | माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन अशी एकूण सेवा ४२ वर्षे. (सर्व सेवा 'हिंद सेवा मंडळ' या संस्थेत)<br>हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख व प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त. अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. संपादन केली. |
| **सामाजिक कार्य** | : | आदिवासींमध्ये वैयक्तिक स्वरूपात व 'वनवासी कल्याण आश्रम' आणि 'आनंदोत्सव' या संस्थांच्या माध्यमातून सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक सेवा व प्रबोधनात्मक कार्यात सहभाग. राष्ट्र सेवा मंडळ, अध्यक्ष.'आनंदोत्सव' ट्रस्टचे संस्थापक चेअरमन. स्फूर्ति प्रकाशन मंचच्या माध्यमातून दोन वेळा ग्रंथयाग (सामूहिकतत्त्वावर ग्रंथ प्रकाशन), दोन्ही ट्रस्टच्या माध्यमातून सांस्कृतिक व सामाजिक कार्य. लेखक आणि विचारवंत. |
| **विशेषत्व** | : | 'लोकबंध', 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' ह्या ग्रंथातून स्वतंत्र तत्त्वचिंतन घडले आहे. अमोघ वक्तृत्वाची दैवी देणगी त्यांना प्राप्त आहे. 'अगस्त्य महात्म्य' हा श्री अगस्त्य ऋषी आज्ञेने प्रकटलेला दिव्य उपासना ग्रंथ म्हणजे त्यांच्या जीवित कार्यातील दिव्यानुभूती होय. |

**मिळालेले महत्त्वाचे पुरस्कार :**

१) आदर्श शिक्षक पुरस्कार (१९८७)

२) 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' या ग्रंथास 'कांची कामकोटी पीठ', जगद्गुरु शंकराचार्यांकडून ज्ञानेश्वरी लेखन सप्तशताब्दी वर्षात महाराष्ट्रातील निवडक नऊ विद्वानांत विद्वत पुरस्कार (१९९२).

३) 'लोकबंध' ग्रंथास लोकसाहित्य संशोधन मंडळ, औरंगाबाद येथील संशोधन पुरस्कार (२०००).

४) अकोले (जन्मगावी) लोकरंजन प्रतिष्ठानच्यावतीने साहित्य क्षेत्रातील कामगिरीबद्दल 'अकोले गौरव' पुरस्कार २० फेब्रुवारी २०१०.



५) 'अगस्त्य' कादंबरी, 'अगस्त्य महात्म्य' उपासना पोथी, यासह अन्य लेखनातील तत्त्वज्ञान प्रसृतीकरणाबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद श्रेष्ठता पारितोषिक २००९-२०१० या वर्षातील महाराष्ट्र साहित्य परिषदेचे राजा फडणीस पुरस्कृत रामाचार्य अवधानी तत्त्वज्ञानविषयक लेखन पारितोषिक. (१६ मे २०१०)

६) समग्र साहित्यिक कामगिरीबद्दल 'साहित्यसेवा' पुरस्कार द्वारा पद्मश्री विखे पाटील फौंडेशन प्रवरानगर २०१२

७) जीवनगौरव पुरस्कार, द्वारा- गुरुकुल भागताश्रम, चिचोंडी पाटील, अ.नगर २०१४

८) 'चाळीसगावडांगाणी (खंड १) – लोकवाङ्मय' व 'चाळीसगावडांगाणी (खंड २) लोकबंधात्मक चिकित्सा' या खंडात्मक ग्रंथास अभिजात मराठी पारितोषिक (सामाजिक शास्त्रे या विषयांतर्गत स्वतंत्र ग्रंथास) द्वारा- महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे २०१४

९) चाळीसगावडांगाणी खंड १ व २ साठी 'लोकगंगा' राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार २०१४

## प्रसिद्ध साहित्य

### अ) संशोधन / समीक्षा / वैचारिक :

१) 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास'. पीएच.डी.साठी प्रबंध पुणे विद्यापीठ. पीएच.डी. १९७९-८०. २) चाळीसगावडांगाणी (खंड १) लोकवाङ्मय- आनंदोत्सव प्रकाशन मंच, ३१ डिसेंबर २०१३. ३) चाळीसगावडांगाणी (खंड २) लोकबंधात्मक आकलन- आनंदोत्सव प्रकाशन मंच, ३१ डिसेंबर २०१३. ४) लोकसाहित्य विचार : सविता प्रकाशन, औरंगाबाद १९९०. ५) 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९१, द्वितीय आवृत्ती २००५. ६) लोकबंध : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९५, द्वितीय आवृत्ती नितीन प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे २०१२. ७) लोकसाहित्य संशोधन पद्धती : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९७, द्वितीय आवृत्ती नितीन प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे २०१२. ८) अन्नासाठी दाही दिशा : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००२. ९) लोकसाहित्याचा अन्वयार्थ : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००३. १०) प्रस्तावना : स्वरूप आणि संकल्पना – पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००७. ११) समीक्षा : प्रयोजन आणि कार्य – दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००८. १२) लोकसाहित्याच्या अभ्यासातील चकवे आणि उतारे : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २०१०. १३) लोकबंधात्मक चिकित्सा : नितीन प्रकाशन पुणे, प्रकाशक श्री. नितीन गोगटे, २०१२. १४) लोकी अलौकिक तुकाराम : प्रकाशक डॉ. लहवितकर प्रोफेसर व प्रमुख श्री तुकाराम अध्यासन, पुणे विद्यापीठ, पुणे २०१२. १५) (सार्थ) 'बालावबोध' : समर्थ स्वामी त्र्यंबकराज महाराज (भावानुवाद) – समर्थ स्वामी त्र्यंबकराज देवस्थान ट्रस्ट, देवळाली प्रवरा, राहुरी, अहमदनगर २०१२. १६) '(सार्थ) योगसंग्राम' संत श्री शेख महंमद महाराज (भावानुवाद) – संत श्री शेख महंमद महाराज उत्सव समिती ट्रस्ट श्रीगोंदा, अहमदनगर २०१४. १७) 'संतांचिया संगे'- मोरया प्रकाशन, पुणे/डोंबिवली २०१४. १८) आदिमांचे वर्तमान : चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०१५ १९) लोकनिष्ठ अध्यात्मवाद, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०१६ २०) गाथा पांडुरंग – प्रेसकडे. १८) 'आदिमांचे वर्तमान'- चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०१५. १९) 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद'- पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०१६. २०) 'कैवल्यगंध'- आनंदोत्सव, नगर २०१६. २१) 'लोकधर्म'- आनंदोत्सव, नगर २०१६. २२) 'साहित्याची समग्रता'- चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०१६. २३) गाथा पांडुरंग (प्रेसकडे)

### ब) ललित साहित्य –

#### (i) कादंबरी :

१) डांगाणी : परिमल प्रकाशन. औरंगाबाद १९८५. २) काळ साद घाली : 'अद्‌भूत कादंबरी' मासिक, संपा. ग. वा. बेहेरे १९८६. ३) अहिनकुल : परिमल प्रकाशन, औरंगाबाद १९८६. ४)

वावटळ : राजेंद्र पब्लिकेशन पुणे/ठाणे १९८७. ५) भेद : राजेंद्र पब्लिकेशन पुणे/ठाणे १९८८. ६) मातंगी : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९२. ७) क्षयवटाच्या पारंब्या : राहुल प्रकाशन, मुंबई १९९२. ८) सत्यनारायण थापाडे पाटील : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९३. ९) परवेडा : प्रीती प्रकाशन, पुणे २००२.१०) 'अगस्त्य' पद्मगंधा प्रकाशन, पुणे २८, फेब्रु. २०१०. ११) 'नारद': पद्मगंधा प्रकाशन, पुणे (प्रेसकडे) ('अगस्त्य' कादंबरीचा इंग्रजी अनुवाद व कन्नड अनुवाद प्रेसकडे).

**(ii) कथासंग्रह :**

१) इंडियन फ्रायडूच्या चंद्री आणि इतर कथा : क्रिएटिव्ह कम्युनिकेशन, नगर २००१. २) कारव : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००२. ३) विलक्षण : प्रीती प्रकाशन, पुणे २००३. ४) नारद ब्रेकींग न्यूज : पद्मगंधा प्रकाशन, पुणे, एप्रिल २०१२

('बापाचे बाप सोऽहम' – नारद ब्रेकींग न्यूज, इंग्रजी अनुवाद प्रा. स्फूर्ती सहस्रबुद्धे–देशपांडे, आनंदोत्सव प्रकाशन, द्वितीय आवृत्ती)

**(iii) नाटक :**

१) भरारी आणि भानगडी : नंदा प्रकाशन, मुंबई २००१. २) संभव असंभव : प्रीती प्रकाशन, पुणे २००२. (नाटकांचे विविध प्रयोग झाले)

**(iv) एकांकिका :**

१) कातळी निखारे : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००३.

**(v) कवितासंग्रह :**

१) आव्हान : स्फूर्ती प्रकाशन, नगर १९९४. २) कोऽहम : हेमंत प्रकाशन, नगर २००६. ३) प्रिया : हेमंत प्रकाशन, नगर २००६. ४) श्री अगस्त्य महात्म्य : प्रकाशक सौ. उषा सहस्रबुद्धे, नगर २००८ (पोथी) ५) मानसतरंग : क्रिएटिव्ह प्रकाशन, डिसेंबर २०११.

(श्री अगस्त्य महात्म्य कन्नड अनुवाद श्री. श्रीकांत पाठक, कल्याण, आनंदोत्सव, नगर २०१५)

('आव्हान'चा हिंदी अनुवाद डॉ. अमरजा रेखी ('चुनौती') आनंदोत्सव प्रकाशन, द्वितीय आवृत्ती)

('प्रवरामाय' कवितेचा इंग्रजी अनुवाद प्रा. स्फूर्ती सहस्रबुद्धे–देशपांडे, आनंदोत्सव प्रकाशन, द्वितीय आवृत्ती)

**(vi) ललित/चिंतनात्मक :**

१) जनात आणि मनात : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००२.२) मनात आणि अवकाशात, मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००३. ३) स्पंदन शिल्पे : आनंदोत्सव प्रकाशन मंच, नगर, ऑगस्ट २००९.

**(vii) संपादित :**

१) ज्ञानवेध : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९० (डॉ. मोरजे गौरवग्रंथ) २) तेजाची लेणी : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९९ (स्वातंत्र्यवीर सावरकर, कवी कुसुमाग्रज आणि शाहीर अमरशेख यांच्या राष्ट्रीय जाणिवेच्या निवडक कवितांचा संग्रह. पुणे विद्यापीठाचे एफ.वाय.बी.ए.साठी नेमले गेलेले पाठ्यपुस्तक.) ३) 'अभंगपौर्णिमा' या ग्रंथात समीक्षालेखन सहभाग आणि संपादन साहाय्य, अभंगपौर्णिमा प्रकल्प प्रमुख, आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर. अभंगपौर्णिमा : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २०११. ४) आनंदमेळा – कविसंमेलन : आनंदोत्सव प्रकाशन मंच, नगर २०१२.

**(viii) प्रासंगिक :**

विविध दैनिके आणि नियतकालिके यांतून विपूल लेखन.